
विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष दुसरे | अंक नववा | सप्टेंबर २०२२

## शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन
## विशेषांक



# २० ऑगस्ट २०२२ शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिदिनानिमित्त निर्भय मॉर्निंग वॉक

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमित्त दाभोलकरांचा जेथे खून करण्यात आला, त्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलापासून एस एम जोशी सभागृहापर्यंत निर्भय मॉर्निंग वॉक करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, महाराष्ट्र अंनिसचे अध्यक्ष अविनाश पाटील, कार्याध्यक्ष माधव बावगे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष वारे, वचन साहित्याचे अभ्यासक डॉ. शशिकांत पट्टन उपस्थित होते. राज्याच्या सर्व जिल्ह्यातील अंनिसचे प्रातिनिधिक कार्यकर्ते देखील यावेळी उपस्थित होते. विवेक जागर मशाल घेऊन ते सहभागी होते. तसेच समविचारी संस्था संघटनांचे कार्यकर्ते सहभागी होते.




महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावरती घोषणा देताना डॉ.बाबा आढाव, भाई अविनाश पाटील, सुभाष वारे इ.




डॉ. बाबा आढाव मार्गदर्शन करताना सोबत भाई अविनाश पाटील, माधव बावगे, शशिकांत पट्टन इ.




महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलापासून एस. एम. जोशी सभागृहापर्यंत निर्भय मॉर्निंग वॉक करताना.




विवेक जागर मशाल पेटवताना सर्व जिल्ह्यातील कार्यकर्ते




महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावरती निषेध व्यक्त करताना सहभागी कार्यकर्ते



निर्भय मॉर्निंग वॉक

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष दुसरे । अंक नववा**
**सप्टेंबर २०२२**

## शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन
## विशेषांक

## अंतरंग


- **संपादकीय** २
- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अंधश्रद्धा निर्मूलन** — डॉ. बी. एम. हिर्डेकर ३
- **अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके आणि अंधश्रद्धा** — डॉ. दिलीप चव्हाण, प्रकाश वाघमारे ७
- **धर्मश्रद्धा आणि भाषा** — डॉ. नंदकुमार मोरे १३
- **वैद्यकीय विश्व आणि अंधश्रद्धा निर्मूलन** — डॉ. विवेक निकम, डॉ. अतुल निकम १६
- **प्रसारमाध्यमे : अंधश्रद्धा आणि अज्ञान उत्पादन** — डॉ. शिवाजी जाधव २०
- **खगोलविज्ञान आणि फलज्योतिष** — डॉ. नितीन शिंदे २३
- **शिक्षणातून अंधश्रध्दा निर्मूलन** — प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार २८
- **कार्याध्यक्ष संवाद** — माधव बावगे ३०
- **महाराष्ट्र अंनिसची खबरबात** — अनिल शोभना वसंत ३१
- **विवेक-विज्ञान शब्दकोडे** — उत्तम जोगदंड ३५


विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
  किशोर बेडकिहाळ
- **मुखपृष्ठ**
  प्रा. संजय साठे
- **स्वागतमूल्य : ₹ २५/-**

**वार्षिक वर्गणी**

**४००** रू. (व्यक्तीसाठी) **५००** रू. (संस्थेसाठी)

- **वर्गणी पाठविण्याची सुविधा :**
महाराष्ट्र अंनिस अंतर्गत प्रकाशन संस्थेच्या खालील बँक खात्यावर वर्गणीची रक्कम पाठवू शकता.
**विवेक जागर संस्था,**
**आय.सी.आय.सी.आय. बँक, मुंदडा मार्केट, धुळे**
**खाते नंबर :** 646301002757
IFSC Code : ICIC0006463
- वर्गणीची रक्कम ऑनलाईन पाठविल्याचा स्क्रीनशॉट अजय भालकर (९३५९०८०८२०) यांना पाठवावा. लगतच्या अंकासोबत वर्गणीची पावती पाठवली जाईल.

सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर (जिल्हा सांगली) ४१५ ४०९ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

संपादकीय

## ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी...

'भारताचे भवितव्य शाळांच्या वर्गखोल्यांमधून घडत आहे' अशा शब्दांत कोठारी आयोगाने (१९६६) शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. व्यक्ती, समाज व राष्ट्राच्या विकासामध्ये सर्वाधिक महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक म्हणजे शिक्षण. शिक्षणाची उद्दिष्टे, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्ययन-अध्यापन, अपेक्षित वर्तनबदल वगैरेंमधून नवा समाज घडत असतो. शिक्षणाची मूल्ये व गाभाभूत घटक यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्मितीवर भर दिला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे चिकित्सा, जिज्ञासा, कुतूहल, कार्यकारणभाव, प्रयोगशीलता, तार्किकता, वस्तुनिष्ठता, बुद्धिप्रामाण्य, विवेक वगैरेंचा विकास होतो. व्यक्ती व समाज आधुनिक, पुरोगामी, विवेकी बनतो. ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची अत्यंत गरज आहे. शिक्षण हेच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्मितीचे प्रभावी माध्यम आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन हा विद्यार्थ्यांच्या फक्त अभ्यासाचा भाग न बनता, त्यांच्या विचारसरणीचा, वर्तनव्यवहाराचा, जगण्याचा भाग झाला पाहिजे.

शिक्षणप्रक्रियेतील वैज्ञानिक दृष्टिकोनाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता, आपल्या शिक्षणव्यवस्थेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाबाबत प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे, विविध ज्ञानशाखा व त्यांच्याशी निगडित क्षेत्रे वैज्ञानिक दृष्टिकोन व अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत कोणती भूमिका बजावत आहेत, आदींचा शोध घेण्याच्या उद्देशाने 'शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावरील विशेषांक प्रसिद्ध करीत आहोत.

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यावर भाष्य केले आहे. शिक्षणाशी निगडित विविध घटकांमधील अंधश्रद्धा मांडून वैज्ञानिक दृष्टिकोनाची किती नितांत आवश्यक्ता आहे, हे डॉ. हिर्डेकर यांनी प्रभावीपणे मांडले आहे. डॉ. दिलीप चव्हाण यांनी, शासनसत्ता आणि प्रस्थापित वर्ग आपल्या हितसंबंधांची जपणूक व विचारप्रणालीचे आत्मसातीकरण करण्यासाठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांचा कसा उपयोग करीत असतो, यावर विचारप्रवर्तक मांडणी केली आहे. शालेय पाठ्यपुस्तकांना आपण अधिकृत, विश्वसनीय मानतो. परंतु शालेय अभ्यासक्रम हा सत्ताधारी वर्गाच्या हितसंबधाचा प्रचार, प्रसार करण्याचे प्रभावी माध्यम कसे असते, याची सैद्धांतिक व उपयोजित मांडणी डॉ. चव्हाण यांनी केली आहे. अशा स्वरूपाच्या अभ्यासाचा एक विचारव्यूह, अभ्यासपद्धती व अन्वेषक दृष्टी विकसित करण्याचे मूलभूत कार्य डॉ. चव्हाण यांनी केले आहे. भाषिक व्यवहारामध्ये वापरल्या जाणाऱ्या शब्दांमधून कळत-नकळत अंधश्रद्धांचे संदर्भ कसे प्रकट होतात, याचे विवेचन डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे. भाषा आपल्या जाणीव नेणीवेचा भाग असते. भाषेतूनच आपल्या भावना, विचार वगैरेंची अभिव्यक्ती होत असते म्हणून प्रबोधनाची, परिवर्तनाची भाषा जाणीवपूर्वक घडवण्याची किती गरज आहे, हे या निमित्ताने प्रकर्षाने जाणवते. डॉ. विवेक व डॉ. अतुल निकम यांनी स्वानुभवाच्या आधारावर 'वैद्यकीय क्षेत्रातील अंधश्रद्धा' व त्यांच्या कारणांची मीमांसा केली असून त्यांचे उपयोजन केल्यास समाज अंधश्रद्धामुक्त होण्यास हातभार लागेल. माध्यमांच्यामधून अंधश्रद्धा व अज्ञानाचा कसा प्रसार केला जात आहे, यावर डॉ. शिवाजी जाधव यांनी भेदक प्रकाश टाकला आहे. डॉ. नितीन शिंदे यांनी खगोलविज्ञानाच्या आधारे फलज्योतिषाचा फोलपणा साधार सिद्ध केला आहे. शिक्षणातून अंधश्रद्धा निर्मूलनाचा मार्ग प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी दाखविला आहे. या सर्व लेखकांनी अभ्यासपूर्ण व दिशादर्शक लेखन करून एक अन्वेषण प्रणाली समाजासमोर ठेवली आहे. समाजभान जपणाऱ्या या सर्व लेखकांचे ऋण शब्दातीत आहेत.

हा अंक आपणांस शिक्षणाकडे डोळसपणे पाहण्याचे भान देईल, असा विश्वास आहे.

**डॉ. अरुण शिंदे**

शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन विशेषांक, संपादक



# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अंधश्रद्धा निर्मूलन

**डॉ.बी.एम.हिर्डेकर**
८८६२००५२६८

'इस्त्रो' (Indian Space Research Organisation) या प्रसिद्ध अंतराळ संशोधन संस्थेचे भूतपूर्व चेअरमन डॉ. के. कस्तुरीरंगन या प्रख्यात शास्त्रज्ञांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा (NEP) मसुदा तयार झाला. आता या धोरणास अनुसरून विविध टप्प्यांवर कार्यवाही सुरू झाली आहे.

'गतिमान, कार्यक्षम समाजाची उभारणी हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच नागरिकांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणेही महत्त्वाचे आहे', असे महत्त्वपूर्ण उद्‌गार स्वतः डॉ. कस्तुरीरंगन यांनी एका महत्त्वाच्या प्रसंगी काढले आहेत. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे, विज्ञान प्रसार आणि विज्ञान सामान्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. या धोरणाचा सुरुवातीला प्रसिद्ध झालेला चारशेहून अधिक पानांचा मसुदा, विचारमंथन होवून नंतर ६६ पानांचा करण्यात आला. या मसुद्यातील, प्रस्तावनेच्या पहिल्याच परिच्छेदात Scientific Advancement (वैज्ञानिक प्रगती) असा एक उल्लेख आहे. दुसरा एक Inquiry driven असा शब्द आहे. शोधक अशी अध्ययन, अध्यापन पद्धती असे सांगण्यासाठी ही शब्द योजना आहे.

चारित्र्य संवर्धन आणि इतर गुणांबरोबर विद्यार्थी rational, विचारी, तर्काधिष्टित वागणारा झाला पाहिजे असाही उल्लेख आहे. पुढे या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची तत्त्वे सांगताना पहिल्याच वाक्यात Scientific Temper हा शब्द आहे. थोडक्यात, सांगायचे झाल्यास भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असलेला - कार्यमग्न, उत्पादनशील, सर्वसमावेशक, समतेवर आधारलेला समाज उभा करण्यासाठी योगदान देणारा नागरिक संविधानास अपेक्षित आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अभिप्रेत असलेला सर्वार्थाने परिपूर्ण नागरिक, माणूस घडवायचा असल्यास, 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या संकल्पनेचा शिक्षणाच्या सर्व टप्प्यांवर अगदी प्राथमिक शिक्षणापासून, विद्यापीठीय शिक्षणापर्यंत अंतर्भाव करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण STEM² Science, Technology, Engineering and Maths या विद्याशाखांवर भर देणार आहे. शिवाय एकविसाव्या शतकातील तिसऱ्या दशकात काही अतिप्रगत ज्ञानक्षेत्रे निर्माण झाली आहेत आणि ती जीवनाच्या, उद्योगाच्या सर्व क्षेत्रांना व्यापून टाकणारी आहेत.

यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, विदा विज्ञान, मशिन लर्निंग, त्रिमिती मुद्रण अशा संकल्पना जग बदलण्यास सज्ज साहेत. या अशा सर्व शास्त्रांचा प्रचार, प्रसार आणि वापर सुरू आहे आणि तो वाढतो आहे. या सर्व प्रगत शास्त्रांचा आधार 'वैज्ञानिक दृष्टिकोन' हा आहे. ४.० ही क्रांती संपून ५.० ही क्रांती सुरू होत आहे आणि अतिप्रगत जगात नवनिर्मिती अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. जी राष्ट्रे नवनिर्मितीमध्ये अग्रेसर असतील तीच राष्ट्रे जगात बलशाली, संपन्न ठरत आहेत. या सर्व गोष्टींच्या केंद्रस्थानी विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या पायाभूत गोष्टी आहेत.

आता पुराणातल्या गोष्टी सांगून, पुराणातील वांगी विकण्याचे दिवस नाहीत. विज्ञानाच्या शिस्तबद्ध कसोटीला उतरणाऱ्या, वैश्विक सत्य, Evidence based पुराव्यानिशी सिद्ध होणाऱ्या गोष्टींचा आग्रह धरण्याचा हा काळ आहे. या दृष्टिकोनातून विचार करता विद्यार्थ्यांच्या अंगी विज्ञाननिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, spirit of Inquiry' चौकस बुद्धी, वृत्ती, प्रश्न विचारणे, पारंपरिक आहे ते तपासून पाहाणे, जे विज्ञानाच्या कसोटीवर उतरत नाही ते नाकारणे या सर्व क्षमता विकसित करणे नितांत गरजेचे आहे. 'वैज्ञानिक दृष्टिकोन' हा केवळ 'विज्ञान' या एकाच विषयाशी निगडित असलेला विषय नाही. ती एक विचारधारा आहे, 'माणूस' हा प्राणी जीवनसृष्टीतील केवळ एक असा प्राणी आहे की, ज्याला 'Ration' बुद्धिवैभव लाभलेले आहे. या प्रगल्भ मानवी बुद्धीला

पटणारे, असे आणि असेच असेल ते स्वीकारणे हा बुद्धिप्रामाण्यवाद या दृष्टिकोनाचा मूलभूत गाभा आहे. सामाजिकशास्त्रांमधील समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र ही सर्व शास्त्रे जे नवनवे ज्ञान उजेडात आणतात किंवा नवर्निमितीही करतात. ती शास्त्रीय कसोट्यांवर, संशोधनाच्या वैज्ञानिक, शिस्तबद्ध, प्रयोगसिद्ध निकषावरच असली पाहिजे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही शाखेत अभ्यास करताना 'वैज्ञानिक दृष्टिकोन' अंगीकारूनच अध्ययन, ज्ञानग्रहण आणि कौशल्ये प्राप्त केली पाहिजेत.

प्रचलित गोष्टी, पारंपरिक रूढी-परंपरा, चालीरीती यावर आधारित गोष्टी पुनः पुनः तपासून या अशास्त्रीय, अवैज्ञानिक, अंधश्रद्धेवर आधारलेल्या गोष्टी नाकारणे, प्रसंगी अशा गोष्टींना विरोध करण्याची भूमिका घेणे आणि अशिक्षित, अल्पशिक्षित, अप्रगत समाजातील लोकांना त्या समजून सांगणे. शिवाय शिक्षित, उच्चशिक्षित असूनही अशा विज्ञानविरोधी किंवा विज्ञानाधार नसलेल्या गोष्टी करणाऱ्या लोकांचे प्रबोधनही करायला हवे.

महाविद्यालयातून शिक्षणाच्या बरोबरीने सहशालेय किंवा इतर सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमातून अंधश्रद्धा, अंधविश्वास, अविचारी, अविवेकी गोष्टी कशा दूर करता येतील यांचे शिक्षण, प्रशिक्षण, औपचारिक-अनौपचारिक पद्धतीने देणे नितांत गरजेचे आहे. विज्ञान शिक्षणाचा प्रसार वेगाने होतो आहे आणि तो झाला पाहिजे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, अन्य प्रगत ज्ञानशाखा या वाढताहेत; पण त्याबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन किती विकसित होतो आहे हे तपासायला पाहिजे आणि तो वाढावा म्हणून ठोस योजना आखायला हव्यात. विज्ञानामुळे वेगळा अपारंपरिक दृष्टिकोन पुढे आला पाहिजे. सामाजिक, सांस्कृतिक बदलाचे साधन म्हणून विज्ञान पुढे आणायला पाहिजे. विज्ञाननिष्ठ समाजाची पुनर्रचना व्हायला हवी, यासाठी शिक्षणात योग्य ते बदल करणे अपेक्षित आहे.

सध्या सर्वच स्तरावरील विद्यार्थी पालकांच्या अपेक्षा आणि धाकाने, परीक्षांच्या भीतीने, अपयशाच्या भीतीने आत्मविश्वास गमावून भोंदूबाबा, बुवा, मांत्रिक, खोटे समुपदेशक, आध्यात्मिक गुरू, Spiritnal mentors यांच्या नादी लागत आहेत. पालकही या अशा भोंदू गुरूंना भरमसाट पैसे देवून मुलांचे भवितव्य त्यांच्या ताब्यात देत आहेत. मेंदू शक्ती, ब्रेन डेव्हलपमेंट, कॉनफिडन्स बिल्डींग, यशाचे मंत्र, परीक्षेत हमखास यश अशा सेमिनार्स आणि उद्‌बोधन (?) वर्गाची चलती आहे. अशातून काही हाती लागत नाही म्हणून व्यसनांच्या आहारी जाणे झाणि शेवटी टोकाची भूमिका म्हणजे आत्महत्या असा मार्ग स्वीकारणारी विद्यार्थीसंख्या वाढली आहे. अशा चिंताजनक स्थितीतून युवा पिढी, शिकणारी पिढी योग्य मार्गावर आणायची झाल्यास, विचार करणारी, विवेकी पिढी घडवणे हे प्राधान्याने करण्याचे काम आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अंमलबजावणीच्या स्तरावर खूप गोष्टी यासाठी केल्या पाहिजेत.

शिक्षणाच्या माध्यमातून विज्ञानाचा प्रसार, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याची प्रक्रिया झाली पाहिजे. विज्ञाननिष्ठा रुजणे म्हणजेच अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा दूर होण्यास मदत करणे असे आहे. संस्कृती, अध्यात्म, आंधळा राष्ट्रवाद, राष्ट्र-दुराभिमान, पौराणिक कथा, भाकड कथा अशा गोष्टी समाजाला अडाणी बनवितात. असा समाज विवेक गहाण टाकतो. 'भविष्य बघत' सांगत फिरणारा, आपलेच भविष्य ज्याला माहीत नाही अशा माणसाला सुशिक्षित माणूस भविष्य बघायला बोलावतो. असा माणूस विवेक हरवलेला, अविवेकी, अविचारी झालेला माणूस असतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन व्यक्तीला चिकित्सा, उकल, समस्या सोडवणूक यासाठी प्रेरित करतो. आज जगातील श्रीमंत, संपन्न राष्ट्रे त्यांच्याकडे असलेले शास्त्रज्ञ, त्यांनी केलेले संशोधन, त्यातून त्यांनी तयार केलेली बौद्धिक संपदा, त्यातून उभे राहिलेले उद्योग यामुळे संपन्न, समृद्ध आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद, नवनिर्मिती, सत्यशोधन चिकित्सा या सर्व संकल्पना समाज पुरोगामी, शहाणा, विवेकी बनविण्यासाठी अत्यावश्यक आहेत आणि शिक्षणाच्याच माध्यमातून त्या रुजविणे शक्य आहे. शहाणा, विवेकी समाज शोषणमुक्तीच्या दिशेने जातो, तर अंधश्रद्धा अविवेकी समाज, व्यसनाधीनता, रूढिप्रियता, पराधीनता या दिशेने जात असतो म्हणूनच आज भारतात आपल्याला अब्जाधीश झालेले बाबा, बुवा दिसतात.

असे आश्रम, सत्संग, सेवाश्रम गावोगावी, मोठ्या शहरातून वाढत आहेत. शाळेच्या इमारतींना, शाळेत संगणक घेण्यासाठी, प्रयोगशाळा सुसज्ज करण्यासाठी गावकऱ्याकडे पैसे नसतात; पण यात्रा, तमाशे, मंदिरे उभारण्यासाठी मात्र वर्गणीच वर्गणी जमते.

पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले तरुण-तरुणी कुंडली पाहून विवाह ठरवितात. उच्चविद्याविभूषित प्राध्यापक कुलगुरू होण्यासाठी देवाला साकडे घालतात. अजून पशुबळी, नरबळी, बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, लैंगिक छळ, स्त्री-पुरुष भेदाभेद, जात, धर्मावरून कलह, आदिवासींचे, वंचितांचे शोषण, कौमार्यभंग चाचण्या अशा संतापजनक आणि देशाची प्रतिमा मलिन करणाऱ्या गोष्टी घडताहेत, त्यांचे प्रमाण वाढतेच आहे. अशा परिस्थितीवर मात करायची असेल, प्रगत, अतिप्रगत राष्ट्रांशी शिक्षणातल्या, उद्योगातल्या गुणवत्तेशी स्पर्धा करायची असेल, शोषणमुक्त समताधिष्ठित समाज निर्माण करायचा असेल, तर वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे आणि विवेकी समाज निर्माण करणे याच गोष्टी प्राधान्याच्या आहेत.

अज्ञानातून निर्माण झालेली अतार्किक अशी श्रद्धा, विश्वास ही अंधश्रद्धा असते. शास्त्राच्या कसोट्यावरून कार्यकारणभाव नसताना एखादी धारणा तयार होणे आणि त्यानुसार वर्तन करणे हे अडाणीपणाचेच आहे. पण सध्या विद्यार्थी वर्ग अशा खोट्या विश्वासांवर, समजांवर विश्वास ठेवून विवेक गहाण ठेवून वावरताना दिसतो आहे. शुभ अशुभ गोष्टी, गुडलक, बॅडलक, मुहूर्त, चांगला दिवस, उत्तम दिवस या सर्व भंपक थोतांड गोष्टी आहेत. तुम्ही कामाला सुरुवात करता तो दिवस कोणताही असो चांगलाच असतो. कारण तुम्ही काम करणार असता, घाम गाळणार असता त्याचे तुम्हाला मोल मिळणार असते.

मूल मातेच्यापोटी जन्म घेते आणि या जगात प्रवेश करते तो दिवस परिवारासाठी आणि त्या मुलांसाठी चांगलाच असतो. तरुणांच्यामध्ये आजकाल विशिष्ट रंग विशिष्ट दिवशी परिधान करणे, हातात, गळ्यात गंडेदोरे बांधणे, विशिष्ट खड्यांच्या अंगठ्या वापरणे या गोष्टी सर्रास दिसतात. एकविसाव्या शतकात आपण अतिप्रगत Ultramodern अशा जगात वावरतो आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने केलेल्या नेत्रदिपक शोधांचा आपल्यास लाभ होतो आहे, हे डोळ्यांसमोर स्पष्ट दिसते आहे. अत्याधुनिक गॅझेट्स आपण वापरतो आहे हे सारे शास्त्रीय शोधातून निर्माण झालेले आहे. हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ असून विद्यार्थी अजूनही, भविष्य, ज्योतिष, कुंडली परदेशवारीचा योग, चांगली नोकरी, चांगल्या पगाराची नोकरी यासाठी लबाड, ढोंगी बुवांचे सल्ले, मार्गदर्शन घेत आहेत. या भयंकर विळख्यातून विद्यार्थ्यांना, तरुणांना मुक्त करायचे असेल तर 'शिक्षण', तर्क, शोध, संशोधन, वैज्ञानिक दृष्टिकोन या गोष्टींचा मार्ग विद्यार्थ्यांना दाखवायला हवा. अनेक अंधश्रद्धा बाळगून आपले करियर घडवण्याचा मार्ग चोखाळणारे विद्यार्थी अपयशानंतर मनोरुग्ण होतात. शरीर तंदुरुस्त, मन खंबीर, वृत्ती सकारात्मक आणि दृष्टिकोन वैज्ञानिक, विवेकी असेल तर कशालाच घाबरायची गरज नाही.

वर्षभर अभ्यास केला आहे, वर्गात बसलो आहे, संदर्भ तपासले आहेत, प्रश्नपत्रिका सोडविल्या आहेत, लिहिण्याचा सराव आहे अशी स्थिती असेल तर पेपर केव्हाही असू दे आणि कसाही असू दे त्यासाठी घाबरायचे कारण नाही आणि कोणाचा धावा करण्याचेही कारण नाही. मनोदुर्बल झालेल्या विद्यार्थ्यांना, अंधश्रद्धेवर आधारित मालिका, मोबाईल गेम, भयपट, सिनेमे बघणारी पिढी अंधश्रद्धेच्या आहारी जाते आहे आणि मुलांच्या काळजीने हवालदिल झालेले हतबल पालकही अंधश्रद्धांना बळी पडताना आपण पाहातो आहोत. यावर विज्ञान शिक्षणाचा प्रसार, प्रचार, तर्कसुसंगत वागणे, वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगणे हे सर्व करण्यासाठी शिक्षणक्षेत्रात प्रत्येक टप्प्यावर काही कृतिकार्यक्रम आखावे लागतील.

सकारात्मक विचारपद्धती, बळकट करण्यासाठी विद्यार्थ्यांना शास्त्रीय सत्यांवर आधारित गोष्टी, दृकश्राव्य माध्यमातून दाखवायला हव्यात. प्रतिकूल परिस्थितीतून केवळ बुद्धीच्या, अभ्यासाच्या जोरावर, कष्टाच्या बळावर यशस्वी झालेले हुशार विद्यार्थी, खेळाडू, उद्योजक यांच्या गोष्टी त्यांच्यापुढे ठेवायला हव्यात. पालकांनी अशा बाबतीत पुढाकार घेऊन विद्यार्थ्याला अधिक कमकुवत करण्याऐवजी स्वत: आत्मविश्वासाने पाल्याच्या पाठीशी उभे राहायला पाहिजे. इथे पालक शिक्षणही महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी विशेषतः विज्ञान शिक्षकांनी, सहशालेय उपक्रम हाती घेऊन अंधश्रद्धा निर्मूलन, अनिष्ट प्रथा बंदी

यासाठी सातत्याने प्रबोधन करायला हवे. अलीकडे, नियमित अभ्यासक्रमात विशिष्ट क्षमतावृद्धी अभ्यासक्रम (Ability Enhancement Courses), विशिष्ट कौशल्यवृद्धी अभ्यासक्रम (Skill based Courses) यांचा अंतर्भाव केला जातो. मूल्यशिक्षण, इंग्लिश संभाषण, भारतीय राज्यघटना, पर्यावरण, आपत्ती निवारण अशा अनेक अभ्यासक्रमांचा समावेश केला जात आहे. खरे तर याबरोबरच, वैज्ञानिक दृष्टिकोन, सकारात्मक विचारपद्धती, लॉजिकल रिझनिंग, critical Thinking अशा जीवनकौशल्याचा अंतर्भाव करून नवी पिढी अंधश्रद्धेच्या आहारी कधीही जाणार नाही, असे पाहायला पाहिजे.

नोबेल ॲवॉर्डसचा इतिहास पाहिला तर आजवर शंभर वर्षांहून जास्त काळ दिल्या गेलेल्या हजारापर्यंतच्या नोबेल्सची सर्वात जास्त नोबेल्स अमेरिकेकडे आहेत. जगातील अशा शास्त्रज्ञांना, हे संशोधन करताना देहदंडाची शिक्षा झाली आहे. प्रथा परंपरेपेक्षा विज्ञान सत्य आहे असे सांगणाऱ्या शास्त्रज्ञांना, तत्त्ववेत्त्यांना देशातून हद्दपार करण्यात आले आहे, तुरुंगात डांबले आहे. पण अशी जिवावर उदार होणारी, 'सत्य' हेच अंतिम आहे आणि 'सत्यशोधन' विज्ञानाच्या कसोटीवरच तपासावे लागते असे प्रतिपादन करणाऱ्या विचारवंतांनी, शास्त्रज्ञांनी हे जग बदलले आहे. अशा थोर महान मंडळींची संक्षिप्त चरित्रे तरुण विद्यार्थ्यांच्या अवांतर पण आवश्यक वाचनात Essential Reading मध्ये समाविष्ट करावी लागतील. पुरोगामी, प्रगतिशील, सत्यशोधकी तरुण घडवायचा असेल तर प्रथम त्याला अंधश्रद्धेच्या मोहजालातून बाहेर काढायला हवे.

सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात होवून गेलेले आणि वैश्विक पातळीवर आपल्या अभंगातून मांडलेल्या तत्त्वज्ञानाने पोहोचलेले, महाराष्ट्रातील घराघरांत दररोज त्यांचे नाव किंवा त्यांचा अभंग उच्चारला जातो अशा महान संत तुकाराम महाराजांनी समाजाला शहाणे करण्यासाठी काही महत्त्वाचे अभंग लिहिले आहेत.

**सत्य असत्याशी मन केले ग्वाही**

**मानियले नाही बहुमता**

अंधश्रद्धांच्या आहारी गेलेले बहुसंख्य लोक अविवेकाने काहीही करतील म्हणून त्यांच्यामागे अविचाराने धावू नका, सत्य कोणते, असत्य कोणते हे तुमच्या स्वतःच्या

सद्सद्विवेकबुद्धीने ठरवा आणि मग निर्णय घ्या. तुकाराम महाराज जनसामान्यांना विचार करा म्हणून सांगतात तरी ते करीत नाहीत म्हणून त्यांना राग येतो–

'वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य

न करिता विचार का हिताचा.'

माणसाने विचार करायला हवा. आपले हित–अहित कशात आहे, हे विवेकाने पाहिले पाहिजे आणि विचार करायचा झाल्यास शिकायला पाहिजे. I think therefor I am. हे रेने देकार्ट या विचारवंताचे जगप्रसिद्ध वाक्य आहे. विचार करणे, शंका विचारणे हे ज्ञानाचे मूलभूत अधिष्ठान आहे. म्हणून विचार करायला हवा. विचार करायला शिकायचे असेल तर मग शिकायला पाहिजे. 'बुद्धिप्रामाण्य आणि मानवता' यासाठी जगप्रसिद्ध असलेला बंडखोर विचारवंत नोबेल लॉरियर बर्ट्रांड रसेल यांनी लिहिलेला The Scientific Outlook' हा ग्रंथ आहे. विज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, वैज्ञानिक पद्धती अशा सर्व गोष्टींचा ऊहापोह या पुस्तकात आहे.

जग शहाणे व्हायचे असेल, रूढी, परंपरेच्या, अनिष्ट प्रथांच्या, जादूटोणा, जाचक, शोषण करणाऱ्या प्रथा अशा सर्व बेड्यांमधून मुक्त व्हायचे असेल, तर माणसाने विचार करायला हवे, शिकायला हवे, समजून घ्यायला हवे, गहन गूढ गोष्टींची उकल करायला शिकले पाहिजे आणि हे सर्व उत्तम शिक्षणातूनच शक्य आहे म्हणून महात्मा जोतिराव फुले म्हणाले, 'विद्येविना मती गेली.' विद्या प्राप्त केली नाही तर मती प्राप्त होणार नाही आणि मग, स्वतःची मती नसलेल्या माणसास, समाजास, अल्पमती, निर्बुद्ध बाबा, बुवा सहजी फसवू शकतो, नाडू शकतो. आता तर शिकलेले अगदी उच्च शिक्षित लोकसुद्धा ज्योतिषांकडून, साधुकडून, बुवाबाबाकडून, मांत्रिकाकडून राजरोस फसविले जात आहेत. निर्बुद्ध समाज, निद्रिस्त समाज आणि बुद्धी असून ती गहाण टाकणारा समाज शहाणा करण्याचे आणि या समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त करण्याचे आव्हान आजच्या शिक्षणव्यवस्थेपुढे आहे. ते शिक्षकांनी आव्हान म्हणूनच स्वीकारायला हवे.

**(पुढील मजकूर पृष्ठ क्रमांक १९ वर)**




# अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके आणि अंधश्रद्धा

**डॉ. दिलीप चव्हाण । प्रकाश वाघमारे**
९४२०६४१५१९

**शिक्षण, अभ्यासक्रम आणि प्रभावशील वर्ग**

शिक्षण हे समाजामध्ये अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. शिक्षणाद्वारे समाजाला ज्ञानी केले जाते आणि आधुनिकतेच्या लाभासाठी सिद्ध केले जाते. नवनव्या शोधांमुळे समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या शक्यता रुंदावतात. जुन्या चालीरीतींना बाजूला सारत शिक्षणामुळे जगण्याच्या नव्या पद्धती अवलंबण्याचे धाडस मिळू शकते. शिक्षणामुळे आपल्याला वैज्ञानिक दृष्टीदेखील मिळू शकते. आधुनिक शिक्षणाद्वारे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य साध्य केले जाऊ शकते आणि शिक्षित व्यक्ती डोळसपणे समाजात वावरू शकते. पण, प्रत्यक्षात असे घडत नाही. शिक्षित लोक सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा बाळगतात, असे आपल्याला दिसून येते.

शिक्षण हे असे माध्यम आहे ज्याद्वारे गरजेनुसार हवा तसा समाज घडवता येतो. समाजाला गरजेनुसार आकार देता येतो. मग तो आकार चांगला असो किंवा वाईट, कोणाच्या हिताचा असो वा हितसंबंधाविरोधात; परंतु शिक्षणातून आपल्याला विशिष्ट प्रकारे घडवले जाते. 'घडवण्याचा' हा प्रकार अनेकार्थी महत्त्वपूर्ण आहे. आणि म्हणून बहुअंगाने या घडवण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास होणे अत्यावश्यक ठरते. याच दृष्टिकोनातून 'पाठ्यपुस्तक आणि अंधश्रद्धा' या मुद्यांकडे चिकित्सकपणे पाहाण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे करत आहोत.

कोणत्याही देशामध्ये सरकार आणि प्रशासन व्यवस्था या आपापल्या हितसंबंधांनुसार शिक्षणामध्ये बदल करून त्यानुसार समाजाला रूपांतरित करण्याचा प्रयत्न सातत्याने करीत असतात. जर सरकार आणि प्रशासन व्यवस्था अंधश्रद्धा व धर्मांध रूढी-परंपरा मानत असेल तर साहजिकच शालेय पाठ्यपुस्तकांद्वारे समाजात अशा अंधश्रद्धा व धर्मांध रूढी-परंपरा रुजविण्याचा प्रयत्न करीत असतात. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्ये १६४९ साली प्यूरीटन विचारांचे सरकार अस्तित्वात होते. या सरकारने लगेच समाजामध्ये धार्मिक व अंधश्रद्धात्मक गोष्टी मोठ्या प्रमाणात रुजविण्यावर भर दिला होता. मुळात, पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून विशिष्ट असा विचार प्रसारित केला जातो. पाठ्यपुस्तकांचा आवश्यकतेनुसार वापर करण्याची परंपरा ब्रिटिश वासाहतिक काळापासून सुरू आहे.

एकूणच, शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थ्यांव्यतिरिक्त शाळेतील शिक्षक, अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके हे अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. शिक्षणाद्वारे मुलांना लहानपणापासून हवी तशी मात्रा दिली जाते. त्याचीच प्रतिबिंबे भविष्यात उमटत असतात. यालाच अनुसरून प्रसिद्ध पाश्चिमात्त्य विचारवंत लुई अल्थुजर असे म्हणतो की, समाजाला नियंत्रणात ठेवण्यासाठी राज्य हे दोन प्रकारच्या मार्गांचा अवलंब करतात. एक म्हणजे दडपशाही मार्गाने सैन्याचा वापर. त्यालाच तो इंग्रजीत "Repressive State Apparatus' असे संबोधतो. समाजाला दडपण्याचा दुसरा मार्ग म्हणजे वैचारिक माध्यम होय. ज्यास तो "Ideological State Apparatuses' असे संबोधतो. प्रामुख्याने दुसऱ्या प्रकारात शिक्षण, धर्म, कुटुंब आणि इतर सामाजिक संस्थाद्वारे लोकांची परवानगी घेऊन त्यांना त्यांचं शोषण होऊ देण्यास पाडलं जातं.

अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ मायकल ॲपल यांनी आयडीओलॉजी ॲण्ड करिकुलम (Ideology and Curriculum) या ग्रंथात शिक्षण आणि विचारप्रणाली यांचा कसा परस्परपूरक संबंध आहे, याची सखोल चर्चा केली आहे. मायकल ॲपल म्हणतात की, शिक्षण हे असे एक प्रभावी माध्यम आहे ज्याद्वारे समाजातील प्रबळ विचारप्रणाली ही समाजात रुजवली जाते. शाळा आणि शिक्षण हे समाजात समता, न्याय आणि मुक्तीचे माध्यम नसून याउलट समाजात जास्त प्रमाणात असमानता निर्माण करण्याचे साधन आहे. आपण सर्वजण शिक्षणाकडे

अपक्षपाती म्हणून पाहातो; परंतु मुळात शिक्षण हे अधिकच पक्षपाती असते. शिक्षणाचा प्रांत समाजातील प्रभावशील वर्गाने स्वत:च्या नियंत्रणात ठेवल्याने शिक्षणाला असे प्रतिगामी रूप मिळते. शिक्षण, अभ्यासक्रम आणि पुस्तके यात सत्ताधारी वर्गाचे हितसंबंध दडलेले असतात. त्यामुळे ते शिक्षणाचा उपयोग आपल्या हितसंबंधासाठी करत असतात. आपण सर्वांनी अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तक याकडे अतिशय चिकित्सकपणे पाहाणे गरजेचे आहे.

**पाठ्यपुस्तक आणि विचारप्रणालीचे आत्मसातीकरण**

एखादे विशिष्ट विचारांचे सरकार आले की, पाठ्यपुस्तकांमध्ये अंधश्रद्धेचा आशय वाढतो ही एक अंधश्रद्धा आहे. मुळात पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून विशिष्ट असा विचार प्रसृत केला जातो. कोणतेही सरकार असले तरी पाठ्यपुस्तकांचा वापर हा करण्याची परंपरा ब्रिटिश वासाहतिक काळापासून सुरू आहे.

आधुनिकपूर्व आणि आधुनिक शिक्षणव्यवस्थांमध्ये एक महत्त्वाचा फरक राहिला. हा फरक पाठ्यपुस्तकांच्या संदर्भात होता. आधुनिकपूर्व काळातील शिक्षणव्यवस्थेत पाठ्यपुस्तके नव्हती; तर आधुनिक शिक्षणव्यवस्थेत पाठ्यपुस्तकांचा विनियोग अगदीच सार्वत्रिक ठरला. हा फरक मुख्यत: आधुनिकपूर्व राज्यसंस्था आणि आधुनिक राज्यसंस्था यांच्यातील फरकामुळे घडून आला.

आधुनिक काळात पाठ्यपुस्तकांच्याप्रति कमालीचे पावित्र्य चिकटविले गेले. पाठ्यपुस्तकांतील ज्ञान हेच अधिकृत ज्ञान आहे आणि तेच स्वीकारले गेले पाहिजे, असा दंडक रूढ करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना 'पाठ्यपुस्तक' हे ज्ञानाचा अधिकृत आणि मान्यतापात्र स्रोत वाटते. परीक्षा ही मुख्यत: पाठ्यपुस्तकांवर आधारलेली असते आणि परीक्षेतील यशावर पुढील पारितोषिक अवलंबून असल्याने पाठ्यपुस्तकांना कमालीची अधिमान्यता मिळाली. पाठ्यपुस्तकांची चिकित्सा करण्यात येऊ नये, असा दंडक रूढ करण्यात आला. पाठ्यपुस्तकांना अचिकित्सक पद्धतीने स्वीकारण्याच्या माध्यमातून व्यापक समाजव्यवस्थादेखील अचिकित्सक पद्धतीने स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांना / शिक्षितांना तयार केले गेले.

पाठ्यपुस्तकाच्या सक्तीच्या व सार्वत्रिक अंमलबजावणीसाठी आधुनिक राज्यसंस्था ही यंत्रतंत्राने सज्ज असणे किंवा तिच्या दिमतीला मुद्रणयंत्रासारखे यंत्र असते हे कारण नव्हते. तर, आधुनिक काळात शिक्षणप्रसार हा अत्यावश्यक बनल्यामुळे नवशिक्षित वर्गाकडून वरच्या वर्गाला धोका वाटायला लागला. या नव्या वर्गाने या समाजव्यवस्थेला धोकादायक ठरू नये म्हणून या वर्गाचे व्यवस्थापन करण्याची भूमिका स्वीकारण्यात आली. या प्रक्रियेत 'शाळा' ही संस्था वापरली गेली.

इंग्लंडमध्ये कारखानदारी क्रांतीच्या दरम्यान नव्या कामगारवर्गाला प्रशिक्षित करणे आवश्यक होते. या कामगारवगाने मालकाच्याप्रति निष्ठाभाव बाळगणे आवश्यक हाते. त्यासाठी त्यांच्या मनात 'निष्ठा', 'शरणागतता', 'आज्ञापालन' ही मूल्ये रुजविणे आवश्यक होते. ही मूल्ये रुजविण्यासाठी नव्या कारखानदारवर्गाने चर्चला पाचारण केले.

अठराव्या शतकात चर्चच्या माध्यमातून कामगारवर्गीय मुलांसाठी 'सण्डे स्कूल' व 'चॅरिटी स्कूल' अशा शाळा उघडण्यात आल्या. गरीब मुलांना धार्मिक शिक्षण देणाऱ्या ह्या शाळा औद्योगिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आल्या होत्या. औद्योगिक क्रांतीनंतर या शाळांची संख्या वाढली. १८३५ पर्यंत 'सण्डे स्कूल'च्या माध्यमातून जुन्या कराराच्या २४,२३२ प्रती आणि बायबलच्या ५,३६० प्रती वितरित करण्यात आल्या होत्या. इतर पाठ्यपुस्तकांमध्ये 'सत्यनिष्ठा', 'त्याग', 'सचोटी', 'सत्यप्रेम', 'स्वामीनिष्ठा', 'ईश्वरश्रद्धा' या मूल्यांवर भर देण्यात आला होता.

प्रबोधनाच्या काळात युरोपमध्ये विवेकवादाचा प्रसार होत होता. 'धर्म', 'ईश्वर', 'स्वर्ग' अशा संकल्पनांना प्रश्नांकित करण्यात येत होते. अशावेळी, या विवेकवादाला रोखण्यासाठी आधुनिक शाळेला जुंपले गेले. अर्थात, या शाळांचा प्रभाव फार टिकला नाही. आज इंग्लंडमध्ये धर्मावर विश्वास ठेवणाऱ्यांपेक्षा विश्वास न ठेवणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. इंग्लंडमध्ये १९८३ मध्ये धर्म नाकारणाऱ्यांचे प्रमाण ३१% होते; २०१५ मध्ये हे प्रमाण ४८% पर्यंत वाढले; तर आज हे प्रमाण ५३% आहे. भारतात हे प्रमाण केवळ ०.२४% आहे. (https://www.bsa.natcen.ac.uk/media-

centre/archived-press-releases/bsa-34-record-number-of-brits-with-no-religion.aspx)


**भारतीय पाठ्यपुस्तके आणि अंधश्रद्धा**

भारत देशसुद्धा अशा गोष्टींना अपवाद नाही. भारतामध्ये स्वातंत्र्यापासून सर्वच पक्षाच्या सरकारांनी आपापल्या हितसंबंधांवर आधारित शिक्षण व्यवस्थेचा उपयोग केला आहे. भारतीय संस्कृती, ओळख, प्राचीन सभ्यता, वेद आणि धर्मग्रंथ याच्या पडद्याखाली समाजात अवैज्ञानिक आणि अंधश्रद्धात्मक गोष्टी ह्या शिक्षणाद्वारे रुजवल्या गेल्या. जगातील प्रत्येक धर्मामध्ये काही प्रमाणात अंधश्रद्धात्मक गोष्टी सामावलेल्या आहेत आणि ते पुन्हा पुन्हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केले जातात. परंतु भारतामध्ये याचे अधिक प्रमाण जाणवते. भारत हा मुळातच अतिशय धार्मिक देश आहे. अनेक जाती व धर्मांमध्ये आपला देश विभागला गेला आहे. हीच देशाची ओळख जपण्यासाठी आणि चिरकाल पुढे-पुढे हस्तांतरित करण्यासाठी शिक्षण व्यवस्था आणि पाठ्यपुस्तके हे एक माध्यम म्हणून पाहिले गेले आहे. समाजाला जास्तीत जास्त अज्ञान आणि अंधश्रध्देत जाणूनबुजून ठेवण्याचा प्रयत्न सत्ताधारी वर्गाद्वारे केला.

मुलांची जडणघडण ही शाळेत होत असते. विद्यार्थी आयुष्यातील बराचसा वेळ शाळेतच घालवत असतात. त्यामुळेच मुलांच्या कोवळ्या बुद्धीला धर्म, जात, रूढी-परंपरा आणि अंधश्रद्धेचे डोस पाजले जातात. शालेय विद्यार्थी उद्याचा समाज असतात आणि अशा समाजाला आपल्या विचारांशी संलग्न असेल अशा रीतीने घडविण्यात शिक्षणाद्वारे यश येते.

भारतामध्ये अधिकाधिक लोकांना 'सश्रद्ध', 'ईश्वरशरण' आणि 'शरणागत' ठेवण्यात आलेले आहे. या प्रक्रियेत आधुनिक शाळा व अभ्यासक्रम यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ब्रिटिश काळात सुरुवातीला जी पाठ्यपुस्तके निर्माण केली गेली त्यांमधून अशाच मूल्यांची रुजवणूक केली गेली. त्याकाळी 'टेक्स्टबुक'ला 'कॉपीबुक' म्हटले जात असे. आधुनिकपूर्व काळात वैदिक शाळांमध्ये पठणावर अधिक भर देण्यात येत असे. ब्रिटिशांच्या हे पथ्यावरच पडले. ब्रिटिशांना शिक्षणाद्वारे चिकित्सक दृष्टिकोन रुजवायचा नव्हता. नवशिक्षितवर्गाने वासाहतिक सत्तेच्या प्रती आदरभाव बाळगणे अपेक्षित होते. वसाहतवाद्यांची ही गरज लक्षात घेऊन शिक्षणखात्याची रचना केली गेली.

ब्रिटिशकाळात मराठीत सुरुवातीला जी पाठ्यपुस्तके छापली गेली त्यामध्ये नीतीपर गोष्टींचा भरणा अधिक होता. उदाहरणार्थ, मेजर कॅण्डी यांनी नीतिज्ञानाची परिभाषा हे पुस्तक १८४८ मध्ये मराठीत अनुवादित केले. त्यातील पहिल्याच धड्यात मनुष्याचे वर्तन परमेश्वराने घालून दिलेल्या नियमानुसार असले पाहिजे, अशी अपेक्षा केली. हे पुस्तक एकोणिसाव्या शतकात शाळांमध्ये पाठ्यपुस्तक म्हणून वापरले गेले होते.


नीतिज्ञानाची परिभाषा

ह्या ग्रंथाचें मूळपुस्तक इंग्लिश भाषेंत
डी. ए. इजदेल साहेब ह्यांनीं रचिलें.
त्याचें हें भाषांतर
मेजर क्यांडी साहेब ह्यांनीं केलें.

[illegible]शाळा वाडाविश्रामबाग [illegible] छापखान्यांत
छापिलें.
छापणारा नारोरामचंद्र टकार.

मुकामपुणें
इसवीसन१८४८
शके१७७०

गौरी विश्वनाथन यांनी असे मांडले की, भारतीय अभ्यासक्रमात धार्मिक शिक्षणाचा अंतर्भाव करण्याबाबत वसाहतवाद्यांवर (ब्रिटिशांवर) ख्रिस्ती मिशनऱ्यांचा मोठा दबाव होता. तथापि, अशा प्रकारच्या धार्मिक शिक्षणातून वसाहतीतील जनतेत भीतीचे वातावरण तयार होईल आणि वसाहतीतील अभिजनांचाही रोष पत्करावा लागेल, अशी भीतीदेखील वसाहतवाद्यांना होती. धार्मिक शिक्षणातील हे धोके लक्षात आल्यानंतर धार्मिक शिक्षणाला जवळ असलेल्या नैतिक शिक्षणाच्या माध्यमातून विशिष्ट अशा लोकमानसाची घडवणूक

प्रस्तावना.

कर्तव्यकर्माचा विचार

परमेश्वरानें प्राणिमात्रास अंगस्वभाव आणि वासना दिल्या आहेत, ह्या शिवाय मनुष्य जातीस त्यानें बुद्धीची एक विशेष शक्ति दिली आहे, जिच्या योगानें आपलीं कर्में आणि इतरांचीं कर्में त्यांचें मनन होऊन अमुक कर्म सत् म्हणून योग्य आहे, व अमुक कर्म असत् म्हणून अयोग्य आहे असा निर्णय होऊन मनुष्य सत्कर्मास मान्य करितें आणि असत्कर्मास अमान्य करितें. बुद्धीच्या ह्या विशेष शक्तीस सदसद्विचारशक्ति ह्मटलें आहे. ही बुद्धिशक्ति मनुष्यास आहे ह्मणून अमुक कर्म करावें आणि अमुक कर्म वर्जावें हा धर्म मनुष्याकडे येतो. ही बुद्धि जी गोष्ट करावी ह्मणून सुचविती त्या गोष्टीचें

४

करणें आणि जी गोष्ट नकरावी ह्मणून सुचविती त्या गोष्टीचें वर्जणें ह्यास कर्तव्यकर्म ह्मटलें आहे.

२. ही सत्कर्मास मान्य करणारी आणि असत्कर्मास अमान्य करणारी बुद्धिशक्ति मनुष्यास आहे हें खालीं लिहिल्या प्रमाणांवरून सिद्ध होतें.

१. ह्याचा साक्षात् अनुभव प्रत्येक मनुष्यास आहे, आणि जसा आपणास आहे तसा दुसऱ्याचे ठायींही आहे असें दृष्टीस पडतें.

२. कल्पित कथेंतही सत् किंवा असत् गोष्टी आल्या असतां हा मनोधर्म सहज होतो.

**(नीतिज्ञानाची परिभाषा इ.स.१८४८)**

करण्याचा प्रयत्न केला गेला. विलियम शेक्सपियर, जोसेफ ॲडिसन, फ्रान्सिस बेकन, जॉन मिल्टन अशा लेखकांच्या साहित्याची पेरणी अभ्यासक्रमात केली गेली (Gauri Viswanathan, Masks of Conquest: Literary Study and British Rule in India (1989; New Delhi: Oxford U P, 2000)).

पाठ्यपुस्तकाच्या सक्तीकरणातून विशिष्ट अशा विचारसरणीच्या खात्रीपूर्वक प्रचारप्रसाराची हमी मिळाली. पाठ्यपुस्तकाच्या सक्तीकरणावर राष्ट्रवादी चळवळीने टीका केली. अशा सक्तीकरणातून शिक्षकांच्या स्वातंत्र्याचा संकोच होतो, अशी टीका महात्मा गांधी यांनी केली होती. जर पाठ्यपुस्तकांना शिक्षणाचे साधन मानले तर शिक्षकांच्या जिवंत शब्दाला फारच कमी किंमत राहाते. जो शिक्षक पाठ्यपुस्तकांमधून शिकवतो तो आपल्या विद्यार्थ्यांमध्ये मौलिकता आणत नाही.

(मूळ : If textbooks are treated as a vehicle for education, the living word of the teacher has very little value. A teacher who teaches from textbooks does not import originality to his pupils.)

(Krishna Kumar, Political Agenda of Education: A Study of Colonialist and Nationalist Ideas (1991; New Delhi : Sage Publication India Pvt. Ltd., 2005) 182.)

स्वातंत्र्यानंतर भारतीय सत्ताधाऱ्यांना ज्याप्रमाणे सैन्यदल, पोलीस, तुरुंग ह्या संस्था वारश्यात मिळाल्या त्याचप्रमाणे शाळा, पाठ्यपुस्तकेनिर्मिती मंडळ ह्या संस्थादेखील वारश्यात मिळाल्या. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रासारख्या राज्यात पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ स्थापन करण्यात आले. अशी मंडळे ही लोकशाही प्रक्रियांपासून लांब ठेवली गेली. पुण्यासारख्या शहरात ती स्थापिली जाणे आणि त्यांचे नियंत्रण अभिजनवर्गाकडून होणे, अशा बाबी जाणीवपूर्वक केल्या गेल्या.

१९७०च्या दशकात जेव्हा रंगीत पाठ्यपुस्तकं छापली गेली तेव्हा पहिलीच्या पाठ्यपुस्तकात ग. ह. पाटील यांची 'देव' ही कविता छापली गेली. संत एकनाथांच्या इतर अनेक रचना वगळून देवांचा देव ही रचना दुसरीच्या पाठ्यपुस्तकात आणली गेली. तिसरीच्या पाठ्यपुस्तकाची सुरुवातच ग. दि. माडगूळकर

यांच्या 'देवाचे घर' या कवितेपासून करण्यात आली, तर चौथीच्या पाठ्यपुस्तकाची सुरुवात रामदास स्वामींच्या मनाचे श्लोक यापासून!

### २२. देव

देवा तुझे किती सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो.

सुंदर चांदण्या चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर पडे त्याचे.

सुंदर ही झाडे सुंदर पाखरे
किती गोड बरे गाणे गाती.

सुंदर वेलींची सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले देवा, तुझी.

—ग. ह. पाटील

(बालभारती, मराठी पुस्तक पहिले
प्रथमावृत्ती १९६८, पुनर्मुद्रण १९७१)

### १. देवाचे घर

इवल्या इवल्याशा
टिकल्या टिकल्यांचे
देवाचे घर बाई उंचावरी
ऐक, मजा तर ऐक खरी!

निळी निळी वाट
निळे निळे घाट
निळ्या निळ्या पाण्याचे झुलझुल पाट
निळ्या निळ्या डोंगरात निळी निळी दरी
ऐक, मजा तर ऐक खरी!

चांदीच्या झाडांना सोन्याची पाने
सोनेरी मैनेचे सोनेरी गाणे
सोन्याची केळी, सोन्याचा पेरू,
सोनेरी आंब्याला सोनेरी कैरी
ऐक, मजा तर ऐक खरी!

देवाच्या घरात गुलाबाची लादी
मऊ मऊ ढगांची अंथरली गादी
चांदण्याची हंडी
चांदोबाची भांडी
चांदोबाचा दिवा मोठा लावला वरी
ऐक, मजा तर ऐक खरी!

(बालभारती, मराठी पुस्तक तिसरे
प्रथमावृत्ती १९६९, पुनर्मुद्रण १९८०)

**हिंदुत्ववादी सरकारे आणि पाठ्यपुस्तके**

आतापर्यंत शिक्षणव्यवस्था सुधारण्यासाठी वेगवेगळ्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी केली गेली. याकरिता वेळोवेळी विविध शैक्षणिक समित्यांची नेमणूकसुद्धा करण्यात आलेली आहे. नेमलेल्या समित्यांनी आपला अहवालदेखील सादर केलेला आहे. सुरुवातीच्या अहवालांवर परंपरावादाचा प्रभाव होता; तथापि उत्तरोत्तर हे अहवाल अधिक धर्मनिरपेक्ष होते गेले. परंतु, निराशी व प्रतिगामी राज्यकर्त्यांनी याकडे मुद्दाम दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. १९६४ मध्ये स्थापित 'राष्ट्रीय शैक्षणिक समिती'च्या अहवालातील बऱ्याच गोष्टी ह्या आतापर्यंत राबवल्या गेलेल्या नाहीत. काही शैक्षणिक समित्यांचे अहवाल तर दडपले गेले.

धार्मिक विचारांचा प्रभाव असलेल्या पक्षांची जेव्हा सरकारे आली तेव्हा त्यांनी पाठ्यपुस्तके अधिक कठोरपणे नियंत्रणात आणली. एनसीइआरटीद्वारे १० वीच्या 'सीबीएससी' अभ्यासक्रमासाठी इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात 'ए लेटर टू गॉड' या शीर्षकाचा एक पाठ आहे. ज्यामध्ये देव आणि इतर अशा काल्पनिक

गोष्टींबद्दल सांगण्यात आलेलं आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक इयत्ता 'पाचवी'च्या मराठीच्या पुस्तकात 'सण एक दीन!' नावाने एक कविता आहे आणि त्यात पोळ्याच्या सणाविषयी मांडणी करण्यात आलेली आहे. पोळ्याचा सण हा बैलांसाठी असतो. त्या दिवशी त्यांना सजवलं जातं आणि त्यांची मिरवणूक काढली जाते. तसेच त्यांना तुपामध्ये मिसळून पिठाचे गोळे खाऊ घातले जातात जे की, त्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक असतात. तसेच, मराठीतील इयत्ता पाचवीसाठी 'इतिहास व नागरिकशास्त्र' या पाठ्यपुस्तकात 'वैदिक संस्कृती' नावाने एक पाठ आहे. ज्यात वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आणि इतर अशा अनेक दंतकथांबाबत माहिती देण्यात आलेली आहे.

गुजरात राज्य पाठ्यपुस्तक इयत्ता आठवीच्या इंग्रजीच्या पुस्तकात साँग ऑफ साँग्स (Song of Songs) ही एक कविता आहे. ज्यात हिंदू देवता 'कृष्ण' याबद्दल माहिती देण्यात आलेली आहे. एकंदरीतच शिक्षणाद्वारे अवैज्ञानिक आणि अंधश्रद्धा ही समाजात मुद्दाम पसरवण्याचे काम सत्ताधारी वर्ग करत असतात.

वरील उदाहरणाद्वारे हे स्पष्ट होते की, कशाप्रकारे समाजामध्ये शिक्षण व पाठ्यपुस्तके यांच्या माध्यमातून अंधश्रद्धा, अवैज्ञानिक आणि अज्ञान पसरवले जात आहे. जास्तीत जास्त धार्मिक आणि धर्मावर आधारित इतर गोष्टींची रुजवणूक समाजात केली जात आहे. लोकांना मुद्दाम धार्मिक, अंधश्रद्धात्मक, वैज्ञानिक आणि काल्पनिक गोष्टींमध्ये बांधून ठेवून त्यांच्यावर राज्य केलं जातं आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय समाज आणि देश हा पुढे जात नाही हे माहिती असूनसुद्धा अतिशय वाईट पद्धतीने शिक्षण आणि पाठ्यपुस्तकांचा उपयोग केला जातो. ही गंभीर अशी गोष्ट आहे.

सध्याचे शैक्षणिक धोरण आणि नॅशनल करिकुलम फ्रेमवर्क यांवर जर आपण नजर टाकली तर आपणास एक स्पष्ट असं चित्र दिसेल. भारतातील काही राज्य सरकारांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' नुसार अंमलबजावणी सुरू केली आहे. तसेच काही केंद्रीय विद्यापीठात ह्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम बदलण्याची सुरुवात झालेली आहे. कर्नाटक राज्य सरकारने शालेय अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके बदलण्यास सुरुवात केलेली आहे. त्याचे पडसाद कर्नाटकमध्ये होत असलेल्या निदर्शनावरून आपणास दिसून येते. यापूर्वी कर्नाटकमध्ये जेव्हा काँग्रेसचे सरकार अस्तित्वात आले होते तेव्हा त्यांनी सुद्धा अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके यात हस्तक्षेप केला होता.

थोडक्यात, शिक्षण, पाठ्यपुस्तक आणि अभ्यासक्रमात बदल कशाप्रकारे केला जातो ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. सत्ताधारी वर्गाच्या विचारप्रणालीची प्रतीके आणि संस्कृती ही शाळेतील मुलांमध्ये रुजवली जातात. राज्यसभा खासदार शरद पवार यांनी काही काळापूर्वी एक वक्तव्य केले होते. ज्यात त्यांनी स्पष्ट केले की, 'केंद्र सरकारने समाजात शिक्षणाद्वारे विष पेरण्याचं काम बंद केलं पाहिजे.' तसेच महाराष्ट्र राज्याच्या माजी शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यानी आपलं मत व्यक्त करत असताना म्हणाल्या होत्या की, महाराष्ट्रामधील शालेय शिक्षणातील धार्मिक आणि अंधश्रद्धात्मक गोष्टी वगळल्या जातील. भाजपचे पुढारी सुवेंधू अधिकारी म्हणाले होते की, शाळेतील पाठ्यपुस्तकांमध्ये धार्मिक ग्रंथ 'गीता' ही समाविष्ट केली पाहिजे. तसेच कर्नाटक सरकारने शालेय पाठ्यपुस्तकातील काही अभ्यासक्रमात बदल करून त्यातील उदारमतवादी आणि वैज्ञानिक गोष्टींवरील आधारित पाठ यांना वगळले आहे आणि त्या ठिकाणी धार्मिक, अंधश्रद्धात्मक गोष्टींवर आधारित पाठांचा समावेश अभ्यासक्रमात केलेला आहे. यालाच विरोध म्हणून कर्नाटकमध्ये विविध सामाजिक, विद्यार्थी व शैक्षणिक संघटनानी उदा. ऑल इंडिया फोरम फॉर राइट टू एजुकेशन, एस.एफ.आय आणि इतर काहींनी विरोध दर्शविला आहे. राज्यभर याविरुद्ध निदर्शने आणि मोर्चेसुद्धा काढण्यात आलेले आहेत.

एकंदरीतच, आधुनिक शिक्षण हे समाजातील मुक्तीचा मार्ग बनू शकते. मात्र त्याचा उपयोग हा समतेच्या तत्त्वाच्या विरुद्धदेखील केला जाऊ शकतो. समाजाला

**(पुढील मजकूर पृष्ठ क्रमांक १९ वर)**



# धर्मश्रद्धा आणि भाषा

**डॉ. नंदकुमार मोरे**
९४२२६२८३००

आजची वैज्ञानिक प्रगती, विविध प्रकारचे तंत्रज्ञान, माहिती प्रसाराची साधने, संपर्क साधने, भौतिक सुखसोयी या विशेषत: एकोणिसाव्या शतकानंतर हळूहळू विकसित झालेल्या आहेत. तत्पूर्वी शेकडो वर्षे भारतीय समाज परंपरागत आणि साचेबद्ध जीवन जगत होता. ईश्वरभक्ती, साक्षात्कार, आत्मा, पाप-पुण्य अशा परंपरागत श्रद्धा जपत तो जगत होता. आपल्या येथील समाजावर धर्मव्यवस्थेतून आलेल्या वर्णव्यवस्थेचा पगडा होता. त्यात भर म्हणजे जातिजमाती खोलवर रुजल्या होत्या. ही व्यवस्था वर्णवर्चस्वासाठीचा राजकीय डावपेच होता. परंतु, तो लक्षात येण्यात शेकडो वर्षे निघून गेली. या शेकडो वर्षांत भारतीय समाज वर्णव्यवस्थेचा बळी ठरला. तो वर्ण, जाती, धर्म अशा विशिष्ट पद्धतीने मार्गक्रमण करीत पुढे सरकत होता. या मार्गक्रमातील अनेक गोष्टी आज हास्यास्पद ठरल्या आहेत. उदाहरणार्थ, समुद्रप्रवास करणे, स्त्रियांनी शिक्षण घेणे, वेदादी साहित्य ऐकणे अशा गोष्टींना पाप मानले जात होते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेमध्ये समाजांतर्गत अनेक बंधने होती. समाजाची दृष्टी व्यापक नव्हती. त्याचबरोबर परकीयांची आक्रमणे, परकीय मुस्लीम राजवटींची सत्ता, संस्थानिकांचा मनमानी कारभार अशा अनेक कारणांनी समाज भांबावलेला होता. अस्थिर होता. त्यामुळेच या समाजाने सुरुवातीस इंग्रजी राजवटीचे स्वागत केले. या स्वागतामागे अनेक कारणे आहेत. यापैकी वर्णाश्रम धर्माचा पगडा झुगारून देण्याची एक संधी म्हणूनही काही लोकांनी इंग्रजांच्या आगमनाकडे पाहिले. याचाच एक भाग म्हणून धर्मांतर करणाऱ्या लोकांची संख्याही त्या काळात मोठी असल्याचे दिसून येते.

मध्ययुगीन काळात ज्ञानेश्वर, नामदेव, यांच्यासह संतमेळ्यामधील गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, चोखामेळा, मुक्ताबाई, जनाबाई, संत एकनाथ, संत तुकाराम ते बहिणाबाईंपर्यंत अनेक संतमहात्म्यांनी आत्मशोधाबरोबरच समाजाला वैचारिक धन दिले. मराठी समाजाला सकारात्मक दृष्टीने प्रेरित करण्याचे कार्य सुरू ठेवले. या साधुसंतांचा तत्कालीन समाजावर प्रभाव होताच, तो आजही टिकून आहे. या सर्व मंडळींनी मराठी भाषेसह मराठी संस्कृतीच्या संवर्धनाला फार मोठा हातभार लावलेला आहे. अज्ञानी, धर्मभोळ्या, जातीपातीमध्ये अडकलेल्या, धर्माची चाड नसलेल्या, दिशाहीन, सांस्कृतिक मूल्ये हरवलेल्या समाजाला दिशा देण्याचे कार्य या संतमंडळींनी केले. आजच्या महाराष्ट्राची सांस्कृतिक पायाभरणी यांच्या विचारांनी केली.

तत्कालीन समाजाची धर्मश्रद्धेशी निगडित पार्श्वभूमीचा आणि तत्कालीन भाषेच्या स्वरूपाचा, शब्दसंग्रहाचा घनिष्ठ संबंध आहे. परमेश्वरभक्ती ही सर्व संप्रदायांमध्ये होती. पाप-पुण्यांच्या कल्पना समाजजीवनात खोलवर रुजलेल्या होत्या. या सर्वांचा परिणाम तत्कालीन भाषेवर झाल्याचे पाहायला मिळते. या कालखंडातील भाषेमध्ये परमेश्वराचा उल्लेख असंख्य नावांनी केलेला आढळतो. वैराग्य, भक्ती, आराधना, ज्ञानग्रहण या गोष्टींना या काळातील साहित्यामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. महानुभावीयांनी आपला आचारधर्म सांगताना या गोष्टी सांगितल्या आहेत. 'देशाचा सेवटी झाडातळी जन्म क्षेपून शयनासनी : भोजनी : परमेश्वरुचि होआवा :', 'ज्ञानेविण वैराग्य ते काई करावे बापेया', 'ती ते नि मृतांचा धर्मी वर्तावे', 'मारिता पुजीता समानचि', 'भिक्षा राज्य बाई', 'जीवे परमेश्वराधीन होआवे', 'धड तुटलेयाही जीवें परमेश्वराते न सोडावे' अशी ही महानुभावीयांची शिकवण आहे. त्या कालखंडातील समाजस्थिती या शिकवणीला कारणीभूत असल्याने भाषा ही तशा प्रकारची तयार झालेली आहे. त्यामुळेच या भाषेमध्ये श्रद्धा, धर्म, जन्म, मरण, पाप, पुण्य, वैराग्य, ईश्वर, भक्ती या कल्पनांशी संबंधित आध्यात्मिक परिभाषा आणि यासंदर्भाने शब्दांनी समृद्ध अशी भाषा पाहायला मिळते.

महानुभावीयांच्या साहित्यानंतर भागवत संप्रदायातील संताच्या साहित्यामध्येही अशी भाषा दिसते. ज्ञानदेव हे व्यापक जीवनदृष्टीचे संत होते. तत्कालीन समाजातील ज्ञानाचा अंधकार दूर करण्याची त्यांची धडपड होती. ‘अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।’ ही त्यांची जगण्याविषयीचीच भूमिका आहे. भक्तिमार्गाने धर्मजागृती करण्यासाठी ज्ञानेश्वरादी संत झगडताना दिसतात. ‘देवाचिया द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या। हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी।’ अशी शिकवण ते समाजाला देतात. ज्ञानेश्वरांच्या भाषेमध्ये येणारे देव, हरी, पुण्य, मुक्ती हे शब्द अतिशय व्यापक अर्थाने येतात. शब्द म्हणण्यापेक्षा या संकल्पनाच आहेत. उदाहरणार्थ, मुक्ती या शब्दातून त्यांना सलोकता, सरूपता, सायुज्जता, समीपता असे अर्थ अभिप्रेत होते.

ज्ञानेश्वरांनी अज्ञानी, अशिक्षित समाजाला शिकवण देण्याचे कार्य केले. त्यांच्यानंतर अनेक जाति-जमातीमधील संत या कार्यासाठी पुढे आले. या सर्वांनी हे कार्य पुढे चालविण्यासाठी किंवा समाजाच्या जागृतीसाठी, आत्माविष्कारासाठी काव्यरचना केली. त्यांनी लेखनासाठी आपल्या दैनंदिन व्यवहारातील भाषा वापरली. तत्कालीन समाजजीवनामध्ये प्रत्येक जातिजमातींचा विशिष्टअसा परंपरागत व्यवसाय होता; तोच व्यवसाय त्या जातीमध्ये जन्मलेल्या प्रत्येकाला करावा लागत असे. त्यामुळे अशा वेगवेगळ्या जातींमधून पुढे आलेल्या सर्व संतमंडळींनी आपल्या जाती-व्यवसायाशी संबंधित भाषा नैसर्गिकपणे आपल्या रचनांसाठी वापरली. त्यामुळे त्यांच्या भाषेला त्यांच्या जाती-व्यवसायाचे संदर्भ आहेत.

नामदेवांच्या शिंपी व्यवसायामुळे त्यांच्या व्यवसायाशी संबंधित भाषा आपोआपच नामदेवांना सुचते. गोरा कुंभाराविषयी लिहिताना म्हणतात, ‘गोरा जुनाट पै जुना। हाती थापटणे अनुभवाचे.’ अशा प्रकारचेच उदाहरण आपल्याला सावता माळी यांच्या अभंगामध्येही पाहाता येईल. व्यवसायाने शेती करणारा हा संत लिहितो,

‘कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।’

स्वत: शेतकरी असल्यामुळेच सावता माळी यांच्या अभंगामध्ये शेतीशी संबंधित शब्दांची विपुलता दिसते.

तत्कालीन समाज जसा व्यवसायनिष्ठ होता; तसाच तो जाती-पातीच्या कल्पनांमुळे श्रेष्ठ-कनिष्ठत्व, सवर्ण-शूद्र अशा गोष्टींना महत्त्व देत होता. संताच्या मांदियाळीत स्थान असलेला; परंतु जातीने दलित म्हणून जन्मलेला चोखामेळा आपल्या अभंगामधून स्वत:ची व्यथा मांडतो. तो म्हणतो,

‘वाणी नाही शुद्ध धड न ये वचन ।
धि:करिती जन सर्व मजला ।।
अंगसंग कोणी जवळ न बैसे।
चोखा म्हणे ऐसे जीवन माझे ।।’

ही व्यथा केवळ चोखामेळा यांचीच नव्हे तर संपूर्ण दलितांची आहे. स्पृश्य-अस्पृश्य या कल्पनांना समाज किती चिकटलेला होता हे या अभंगावरून कळते. चोखामेळा हा एक दलित समाजातील प्रतिनिधी असल्यामुळेच त्याच्या भाषेला जातीचा, अस्पृश्यतेचा संदर्भ येतो. भाषाभेद हे ज्याप्रमाणे समाज, जात, धर्मानुसार दिसून येतात; तसेच ते स्त्री-पुरुष लिंगानुसारही पाहावयास मिळतात. भागवत परंपरेमध्ये काही स्त्रियांनीही महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. स्त्री म्हणून त्यांच्या भाषेला असलेला स्त्रीसुलभ भावनांचा संदर्भ अभ्यासण्यासारखा आहे. संत जनाबाई आपल्या अभंगामध्ये म्हणते,

‘विठो माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा’,
‘तू माझे माहेर । काय पाहसी अंतर ।।
ओवाळूनी पाया। जीवे भावे पंढरीराया ।।’

ही जनाबाईची भाषा स्त्री म्हणूनच येते. तिच्या भाषेमध्ये लेकुरवाळा, लेकुरांचा, माहेर, ओवाळूनी, पंढरीराया असे येणारे शब्द स्त्रियांशी संबंधित आहेत. ही शब्दांची गुंफण स्वाभाविकपणे होताना दिसते. संत तुकारामांनी तर व्यवहाराच्या भाषेमध्ये रचना करून भागवत परंपरेत स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवला आहे. तुकारामांची भाषा हा स्वतंत्र संशोधनाचा विषय व्हावा एवढी विविधता आणि वैशिष्ट्यपूर्णता त्यांच्या भाषेमध्ये पाहायला मिळते. तत्कालीन काळाच्या भाषेवर दृष्टिक्षेप टाकण्यासाठी अशा उपलब्ध साहित्याकडेच वळावे लागत असल्याने भाषेवर असलेल्या धर्मश्रद्धादी क्षेत्रांचा प्रभाव

खूप खोलवर असल्याचे दिसते.

बदलत्या समाजजीवनाबरोबर भाषा बदलते. तथापि, भारतीय समाजावरील धार्मिकतेचा पगडा अद्याप दिसतो. तो भाषेतूनही अभ्यासता येतो. कारण समाजाची भाषा त्या समाजाशी संबंधित परंपरा, रूढी, समजुती, संस्कृती, व्यवसाय इत्यादी गोष्टींमुळे समृद्ध बनलेली असते. समाजाच्या भाषेमध्ये आढळून येणारे धार्मिकतेचे संदर्भ तपासून समाजाची वाटचाल अभ्यासता येते. व्यक्ती उच्चशिक्षित आहे, परंतु, ती नेहमीच्या भाषेत पापपुण्यादी, नशीब आणि देवाधर्माच्या गोष्टी बोलत असेल, शुभअशुभाच्या गोष्टीत गुंतलेली असेल तर शिक्षणाचा आणि त्या व्यक्तीच्या बौद्धिक वाटचालीचाही संबंध तपासला पाहिजे. समाजाच्या भाषा व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर भाषेला असलेले धार्मिकतेचे संदर्भ खूप खोलवर रुजलेले दिसतील. इतकेच नाही ते भाषेशी एकजीव झालेले पाहायला मिळतात. मराठी भाषेत रूढ झालेले देवक, विडा, मुहूर्त, अंगारा, कौल, झाड, देवर्षी, गोमूत्र, प्रतिष्ठापना, ओवाळणी, सुतक, उपास, पंचांग, विटाळ, तिनवी, बारावी, रक्षाविसर्जन, करणी, खेटे, नवस, भंडारा असे शेकडो शब्द पाहिल्यानंतर ही गोष्ट लक्षात येते.

मराठीतील साडेसाती, लगीनघाई, गावगोंधळ, गावभवानी यांसारखे शब्द पाहिले असता हे संदर्भ लक्षात येतील. श्रद्धा समजुतीतून प्रत्येक समाजाचे भाषावापराचे काही संकेत ठरलेले असतात. उदाहरणार्थ, कुंकू पुसले, बांगड्या फुटल्या या वाक्यप्रयोगांचा अशुभसूचक अर्थ असल्यामुळे ही वाक्ये कुंकू वाढले, बांगड्या वाढल्या अशी उच्चारली जातात. तसेच घरातून जाताना 'जातो' न म्हणता, 'येतो' म्हणणे किंवा दुकान बंद करताना 'दुकान वाढवतो' असे म्हणणे ही त्याची आणखी काही उदाहरणे होय. समाजजीवन, राहाणीमान, समाजाच्या बदलत्या मूल्यकल्पना यांमुळे भाषा बदलत राहाते. परंतु परंपरा, रूढी, श्रद्धा या प्रत्येक समाजामध्ये खोलवर रुजलेल्या असतात. पर्यायाने बदलत्या भाषेवरही त्याची छाप दिसतेच.

भारतीय समाजामध्ये धर्म आणि धार्मिकतेला असलेले विशेष स्थान भाषेतून अभ्यासता येते. धर्म, देव, परमेश्वर, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य यांसारख्या कल्पना समाजामध्ये खोलवर रुजलेल्या आहेत. त्याचबरोबर या कल्पना भाषेमध्येही एकजीव झालेल्या दिसून येतात. तीर्थक्षेत्रांना, काही नद्यांना, उदाहरणार्थ; काशी, गंगा यांना धार्मिक जीवनात विशेष स्थान आहे. त्यातूनच 'दारात गंगा आली', 'ज्ञानगंगा', 'गंगाजळी', 'गंगेत घोडे न्हाले' असे भाषाप्रयोग रूढ झाले आहेत. धार्मिक स्थळांप्रमाणेच धार्मिक ग्रंथांनाही असेच महत्त्व असल्याचे दिसते. 'गीतेची शपथ', 'एक अध्याय संपला' अशा शब्दप्रयोगांना असलेला संदर्भ पाहिल्यास ही बाब लक्षात येते. धार्मिक ग्रंथांची रचना अध्यायांनुसार असते. त्यावरून एखादे काम पूर्ण झाले, अडचणीतून सोडवणूक झाली तर; एक अध्याय संपला असे बोलले जाते. 'पंढरीची वारी' ही मराठी जनसामान्यांमध्ये विशेष श्रद्धेची बाब आहे. त्यातूनच दहावी-बारावीचे विद्यार्थी नापास झाल्यानंतर 'सुरू झाली काय आषाढी-कार्तिकी' अशी भाषा ऐकू येते.

गतिमान समाज आणि अलीकडील काही वर्षांपासून सुरू झालेल्या जागतिकीकरणासारख्या प्रक्रियेमुळे संपर्क प्रक्रिया गतिमान झाली आहे. शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार, प्रसारमाध्यमे, इंटरनेट प्रणालीमुळे हा संपर्क वाढत राहाणार आहे. या सर्व गोष्टींचा परिणाम भाषेवर होत आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञानाच्या काळातही भाषेवरील देव, धर्मादी शब्दांचा प्रभाव संपलेला नाही. भारत हा देश तर अनेक जातीधर्मांच्या लोकांनी एकत्र बांधलेला देश आहे. येथे जातीधर्मानुसार धर्मश्रद्धा बदलतात. तशी भाषा बदलते. या भाषेचा सूक्ष्म अभ्यास करून समाजातील धर्मश्रद्धेचे स्थान, अंधश्रद्धेच्या भाषेचा प्रभाव तपासून पाहाता येतो. भारत बहुभाषिक देश असल्याने अशा अभ्यासाला येथे खूप वाव आहे. कारण येथील सांस्कृतिक-भौगोलिक विविधता, ऐतिहासिक पार्श्वभूमी, नैसर्गिक संपन्नता, प्राचीन परंपरा, विविध धर्म, जाती, विविध वर्ग यांमुळे भाषाभेद निर्माण झाले आहेत. हे सर्व भेद, प्रभाव काळाच्या प्रत्येक टप्प्यावर तपासून भाषेच्या माध्यमातून समाजाची वाटचाल अभ्यासता येते.

**(लेखक शिवाजी विद्यापीठात मराठी विभाग प्रमुख, तसेच भाषा, साहित्य, समाज, इतिहास यांचे अभ्यासक व संशोधक आहेत.)**

●

# वैद्यकीय विश्‍व आणि अंधश्रद्धा निर्मूलन

**डॉ. विवेक निकम । डॉ. अतुल निकम**
९४२१०६०१३६

रोजच्यासारखा एक दिवस मी सकाळी ॲडमिट पेशंटचे राऊंड घेत होतो. एका रूमजवळ गेल्यावर कळलं की, दरवाजा आतून बंद होता व आतून मंत्राचे आवाज येत होते. उदबत्त्या, धुपाचा वास येत होता. मी दरवाजा उघडायला लावला तेव्हा पाहातो तर काय, संपूर्ण रूममध्ये भंडारा, अंगारा विस्कटलेला होता आणि कोणीतरी एक बुवा येऊन एका ताप मेंदूला चढल्यामुळे असंदिग्ध बडबड करणाऱ्या पेशंटच्या अंगातील भूत काढण्याच्या नावाखाली पूजा करत होता. वाईट या गोष्टीचं वाटत होतं की, नातेवाईक मला सांगत होते की, ''दवाखान्यातील उपचाराचा काही फायदा होणार नाही, लागीर झाले आहे पोरीला.'' मी त्या सर्वांना हा सगळा प्रकार तुमच्या घरामध्ये करा म्हणून खवळून घरी पाठवून दिले. परंतु मी परत विचार करत बसलो. या अंधश्रद्धेच्या प्रकारामुळे त्या रुग्णाचं खूप नुकसान होणार होतं; परंतु आपण काहीही करू शकत नव्हतो. हा विचार आणि हतबलता मला त्रासदायक ठरत होती.

अजून एक उदाहरण – एक तरुण मुलगा, ज्याला रात्री साप चावल्यानंतर तत्काळ दवाखान्यात घेऊन जाण्याऐवजी सकाळपर्यंत एका मंदिरामध्ये ठेवलं होतं. सकाळी परिस्थिती खूप बिघडल्यानंतर आमच्याकडे हॉस्पिटलमध्ये घेऊन आले होते. परंतु तोपर्यंत विष संपूर्ण शरीरात पसरले होते व त्याला आम्ही वाचवू शकलो नव्हतो.

वैद्यकीय क्षेत्रामध्ये अशा प्रकारचे अनुभव खूप वेळा येतात. रुग्णांमध्ये व त्यांच्या नातेवाईकांमध्ये असलेल्या अंधश्रद्धांमुळे उपचार देण्यामध्ये खूप अडथळा निर्माण होतो. कधी कधी ते त्या रुग्णासाठी जीव घेणंसुद्धा ठरू शकते. हे सगळं का घडतंय या सगळ्याचा विचार करता मला जाणवलं की, या सगळ्यांचं मूळ आपल्या समाजातील गरिबी, आजारांविषयी वैज्ञानिक दृष्टीचा अभाव, अज्ञान, जुनाट रूढी, परंपरा व धार्मिक वातावरण त्यातून अपेक्षित चमत्कार वगैरेंमध्ये आहे. या सगळ्यांमुळेच लोकांना आजारातून बाहेर पडण्यासाठी डॉक्टरांपेक्षा देव, मांत्रिक, बुवा या गोष्टींवर जास्त विश्वास वाटतो. मला माहीत आहे, एका गावात एक असा मांत्रिक होता जो त्याच्याकडे जाणाऱ्या प्रत्येकाला अकरा अमावस्या एका ठरावीक ठिकाणी जाण्यास सांगत होता आणि विशेष म्हणजे त्याच्याच दोन–चार गाड्या होत्या, ज्या त्या भक्तांना घेऊन जात होत्या. यातून त्याला होणारे आर्थिक फायदे सांगायलाच नकोत.

आपण कितीही सांगितलं, तरी मानसिक गुलामगिरीमध्ये हे भक्तगण इतके अडकतात की, तुम्ही समजावून सांगायला गेलं, तर ते आक्रमक होतात. इंग्रजांनीसुद्धा जोपर्यंत भारतीयांना स्वतःला सुधारणा करण्याची इच्छा होत नाही तोपर्यंत भारतीयांच्या सुधारणांचा विचार केला नाही. कारण भारतीयांना त्यांच्या घरातील सोनं, दागिने घेऊन गेले, तर जितका राग येतो; त्याच्यापेक्षा जास्त राग घरातील देवाला हात लावला तर येतो. आजसुद्धा तीच मानसिकता आपल्या लोकांमध्ये आहे. लोकांना आपल्यामध्ये काही बदल करायचे नाहीत. घरातील व्यक्ती आजारी पडू नये म्हणून कोंबडी, बकरे कापायचे आहेत, महागडी रत्ने असलेली अंगठी घालायची आहे. परंतु दूषित पाण्यामुळे आजारी पडू नये म्हणून घरी फिल्टर बसवायचा नाही. आजारी पडल्यावर होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कुटुंबाचा आरोग्य विमा काढायची इच्छा नाही. गेल्यावर्षी उत्तर भारतामध्ये कोरोना रोगापासून आपल्या कुटुंबाचे संरक्षण करण्यासाठी 'कोरोना माता' म्हणून पूजा सुरू झाल्या होत्या. सरकार एवढं ऊर बडवून सांगत होतं, परंतु लोकांना मास्क, सोशल डिस्टन्सिंगसारखे स्वतःवर बंधन घालून घेण्यापेक्षा ते अशा समस्येवर सोपा मार्ग हुडकून काढतात.

आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये महिलांच्या शारीरिक व मानसिक शोषणाचे प्रमाण खूप आहे. त्यामुळेच महिलांमध्ये अंधश्रद्धेचे प्रमाण सर्वात जास्त

आहे. घरगुती ताणतणाव, सासू-सुनेचं भांडण, नवऱ्याची व्यसनाधीनता, आर्थिक टंचाई या सगळ्यात महिला भरडून निघतात आणि ही सगळी परिस्थिती बदलण्यासाठी काहीतरी चमत्कार होईल, आपले आयुष्य बदलून जाईल, या विचाराने त्या मुलासाठी, नवऱ्यासाठी निरनिराळे उपासतापास करतात. त्यातून कुपोषण, रक्त कमी होण्यासारख्या समस्या निर्माण होतात. आज भारतात ५६ टक्के महिलांमध्ये ॲनिमिया म्हणजेच रक्ताची कमी असणे हा विकार आहे. त्याचे मूळ कारण देवाधर्माच्या उपवासामध्ये आहे.

आजारांबद्दल बोलायचं झालं, तर मनुष्याला दोन प्रकारच्या व्याधी होतात, एक शारीरिक व्याधी, दुसरी मानसिक व्याधी. जितके शारीरिक व्याधीचे रुग्ण समाजामध्ये आहेत तितकेच मानसिक व्याधीचेसुद्धा रुग्ण आढळतात. मानसिक व्याधी म्हणजे डायरेक्ट वेडा माणूस नव्हे. कायम ताणतणावात असणे, चिडचिडेपणा, आत्महत्याचे विचार, अतिधार्मिक विचार या सगळ्या मानसिक व्याधी आहेत. शारीरिक व्याधीसंदर्भात ट्रीटमेंट घेण्यासाठी लोक डॉक्टरांचे मत घेतात; परंतु मानसिक व्याधी असेल तर ते  सर्वसामान्यांपासून लपवण्याचा प्रयत्न करतात. त्याबद्दल डॉक्टरांचे मत न घेता देवऋषी, भोंदूबाबा यांच्याकडे जाऊन उपचार घेण्याची प्रवृत्ती आहे. बऱ्याच वेळा वैद्यकशास्त्रामध्ये काही आजारांसाठी खूप दिवस ट्रीटमेंट घ्यावी लागते. लोकांच्या अपेक्षा खूप असल्या, तरी शेवटी वैद्यकशास्त्रालाही काही मर्यादा आहेत. कधी कधी काही आजार पूर्ण बरे होऊ शकत नाहीत त्यावेळी लोक चमत्काराच्या अपेक्षा करतात आणि ह्या भोंदूबाबांच्या नादी लागतात.

काही वेळेला कावीळ, नागिनसारखे आजार डॉक्टर ठीक करत असतानाही ग्रामीण भागात गावठी उपचाराच्या नावाखाली डोळ्यात, कानात औषध टाकले जाते, गळ्यात .....माळ घातली जाते आणि आजार नीट करण्याचे दावे केले जातात. शास्त्रीयदृष्ट्या यांना कोणताही आधार नसतो, इथे फक्त लोकांच्या जीवाशी खेळ खेळला जातो. आपल्या वैद्यकीय क्षेत्रामध्ये आजारांसंबंधात खूप सारे गैरसमज, अंधश्रद्धा प्रचलित आहेत, त्या थोडक्यात देण्याचा प्रयत्न करतो.

- बियर पिल्याने मुतखडा पडतो.
- दारू पिल्याने कोरोना होत नाही.
- पारवा, घोरपड यांचे मांस खाल्ल्याने अर्धांगवायू रुग्णाची ताकद परत येते.
- आयुर्वेदिक औषधाला साईड इफेक्ट नसतात.
- डॉक्टरांनी जास्त पॉवरच्या गोळ्या इंजेक्शन दिल्यामुळे रिॲक्शन येते.
- नवरा-बायको दोघांचे ब्लड ग्रुप एक असल्यावर मुले होत नाहीत.
- 'ओ' ब्लड ग्रुप असल्यावर विंचूदंश चढत नाही.
- तिसरा अटॅक आल्यावरच माणूस मरतो.
- फिट आल्यावर चप्पल, कांदा हुंगायला दिल्यावर रुग्ण शुद्धीवर येतो.
- मुडदूस आजारात पाठीवरचे किडे काढल्यावर मूल ठीक होते.
- हाताची नखे एकमेकांवर घासल्यानंतर केस वाढतात.
- ताईत, गंडेदोरे बांधून व मरिआईसारख्या देवीची पूजा करून आजारापासून संरक्षण मिळते.
- तांब्याची अंगठी व वाळा घातल्यावर उष्णता कमी होते.
- नागिन आजाराला डॉक्टरकडे औषध नसते.
- दातपट्टी गळ्यात बांधल्यावर बाळाला दात येतात.
- अंबाबाईचा कोप झाल्याने त्वचेवर नायटा होतो.
- विषारी साप चावल्यावर कडुनिंबाचा पाला गोड लागतो.
- गर्भवती महिलेने ग्रहण पाहिल्यास व्यंग मुले जन्माला येतात.
- टॉनिकच्या गोळ्या खाल्ल्यामुळे बाळ मोठे होऊन सिझर करण्याची वेळ येते.
- जिवंत मासा गिळल्यावर दमा नीट होतो.
- Azithromycin ने सर्दी कमी होते.
- लसीकरणामुळे डीएनएमध्ये बदल होतो
- चिकनगुनिया चिकनमुळे होतो.

- गुळामुळे साखर वाढत नाही.
- अतिगोड खाण्यामुळे पोटात जंत होतात... इत्यादी.

उदबत्ती, धूप यांच्यामधून निघणारा धूर सिगारेट इतकाच घातक असल्याचे सिद्ध झाले आहे, तरीही घरातील वातावरण उदबत्ती लावून प्रसन्न ठेवण्याच्या नादात प्रदूषित केले जाते. आपल्याकडे जे संधिवाताचे पेशंट असतात ते वयानुसार आपले सांधे कमकुवत झाले आहेत हे मान्य करायला तयार नसतात. रोज नवीन डॉक्टरकडे जाऊन कोणाचा तरी गुण येईल म्हणून फिरत असतात. मग एखादा भोंदू, बोगस डॉक्टर आयुर्वेदिक औषधांच्या चूर्ण किंवा सिरपमध्ये स्टिरॉइड मिसळून लोकांना ताबडतोब गुण देण्याच्या प्रयत्नात त्यांच्या शरीराची कायमस्वरूपी हानी करून टाकतो. गावाकडचे लोक चमत्काराच्या आशेने गाड्या भरून तिकडे जायला लागतात. दोन-तीन वर्षांपूर्वी पुण्यामध्ये अशाच एका गावात पाणी पिल्यानंतर संधिवात ठीक होतो अशी अफवा सगळीकडे पसरली व तिथे पाणी पिण्यासाठी रोज जत्रेसारखे स्वरूप आले होते. काही दिवसानंतर त्यांची लबाडी लोकांच्या लक्षात आली. परंतु अशा चुकीच्या उपचारांमुळे रुग्णांना किडनी बाद होणे, पोटामध्ये अल्सर तयार होणे, बीपी-शुगर वाढणे अशा कित्येक आजारांना सामोरे जावे लागते. दारू सोडण्यासाठी काही महाराज दारूमध्येच काही टाकून औषध देतात व त्यामुळे जास्त प्रमाणात उलट्या होऊन कित्येक व्यक्ती मरण पावले आहेत. तरीही आपल्या समाजाला जाग आलेली नाही.

आजारासंदर्भात अंधश्रद्धा फक्त अशिक्षित लोकच बाळगतात हीच सर्वात मोठी अंधश्रद्धा आहे. सुशिक्षित समाजही यामध्ये मागे नाही. डिलिव्हरी नॉर्मल होत असतानाही मुहूर्त पाहून सिझेरियन करून मुले जन्माला घालणारे सुशिक्षित लोकच आहेत. पुत्रप्राप्तीसाठी गुजरातला जाऊन पार्वती मातेकडून पोटावर हात फिरवून घेणारे महाभाग काही कमी नव्हते. तसेच नाशिकला फरशी बाबाकडून आपल्या मणक्यावर उपचार करून घेणारेसुद्धा भरपूर भेटतात. बागलकोटचा असलमबाबा तर पोटावरती हात फिरवून लोकांचे मुतखडे ऑपरेशन न करता बाहेर काढत होता. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या सर्वांचा फोलपणा उघड केला; परंतु समाज आपली मानसिकता जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत असले महाराज, माता जन्माला येतच राहाणार.

कोरोनाची दुसरी लाट आली, त्यामध्ये बऱ्याच गावागावांतील तरुण मंडळी ह्या कोरोनामुळे मरण पावली आहेत व आज प्रत्येक गावात चार-पाच तरी तरुण विधवा मुली आहेत. त्यांचं भविष्य पूर्णपणे अंधकारमय झालेलं आहे. आमच्या ओपीडीमध्ये अशीच एक सात-आठ महिन्यांपूर्वी लग्न झालेली मुलगी येत होती. तिचा नवरा कोरोनामध्ये वारला होता. ती स्वतः व तिचे पालक तिच्या भविष्याच्या विचाराने खूप चिंतेत होते. आम्ही दोघांनी त्या कुटुंबाचे समुपदेशन करून त्यांना पुनर्विवाहाला तयार केले. त्यांच्याच पाहुण्यातील एका शिक्षकाने तिच्यासोबत विवाह केला. त्या शिक्षकाची बायको कोरोनामध्ये वारली होती. त्या विवाहानंतर आम्हाला दोघांनाही एक चांगलं काम केल्याचं खूप समाधान वाटत होतं. आपला समाज जुन्या, बुरसटलेल्या विचारांच्या अधीन असल्यामुळे अशा मुला-मुलींच्या मनाचा विचार कोणीही करताना दिसत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजसुधारकांनी विधवा पुनर्विवाहासाठी जी चळवळ राबवली होती ती परत एकदा कोरोना साथीनंतर राबवायची व अशा सर्व मुला-मुलींची नोंद घेऊन त्यांच्या पालकांमध्ये मतपरिवर्तन करण्याची गरज आहे. बऱ्याच वेळा पालकांची इच्छा असूनही समाज काय म्हणेल या भीतीने आज या भगिनी दुःखमय आयुष्य जगत आहेत. पुरुषांनीसुद्धा आपल्या बायका कोरोनामध्ये गमावल्या आहेत. आपल्याला फक्त या दोघांच्या कुटुंबीयांमध्ये संपर्क घडवून आणायचा आहे व हे पवित्र काम करायचे आहे. संपूर्ण महाराष्ट्रात गाव, तालुका, जिल्हा पातळीवर यांची नोंद घेऊन पुनर्विवाह मेळावे आयोजित केले पाहिजेत. यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती पुढाकार घेईल, याची मला खात्री आहे. ही एक खूप मोठी चळवळ असेल. ज्यामध्ये एखादे ॲप तयार करून आपण नोंदणीसाठी आवाहन करू शकतो.

वैद्यकीय क्षेत्रातील अंधश्रद्धा कमी करायच्या असतील तर लोकांनी आजारी पडल्यावर उपचारांसाठी ज्यांना परवाना प्राप्त आहे अशा डॉक्टरांवर विश्वास ठेवून योग्य ते उपचार घेतले पाहिजेत. लवकर बरे होण्याच्या नादात भोंदू, बोगस डॉक्टरांच्या नादी लागून चुकीचे

उपचार घेणे टाळले पाहिजे. उपचाराच्या अधिकृत पद्धतीमधूनच आपले उपचार करून घेतले पाहिजेत. हमखास १००% बरं करण्याची हमी देणारे, रेकी उपचार, चुंबक उपचार आदी परवानगी नसणाऱ्या उपचार पद्धतींकडून उपचार घेऊन आपल्या शरीराची प्रयोगशाळा करून ठेवू नये.

रुग्णांप्रमाणेच काही डॉक्टरांमध्येही अंधश्रद्धा आढळतात. काही डॉक्टरांच्या रिसेप्शनमध्ये महाराज, साधू, देवदेवतांचे फोटो लावलेले असतात व ते आपल्या यशाचे सर्व श्रेय त्या दैवी शक्तींना देत असतात. नवीन पिढी याचे अंधानुकरण करण्याचा धोका असतो. पेशंटवरही दैववादी प्रभाव पडू शकतो. यातून एक सुशिक्षित अंधश्रद्धाळू पिढी निर्माण होऊ शकते म्हणून डॉक्टरांनी फक्त शास्त्रीय वैद्यकीय ज्ञानालाच प्रमाण मानावे. डॉक्टरांनी व्यक्तिगत श्रद्धा, भावनांचे दर्शन हॉस्पिटलमध्ये करू नये. आपण ज्या वैद्यकीय विद्याशाखेचे अध्ययन केले, त्या शाखेने जी दृष्टी व दृष्टिकोन दिला, त्याचाच उपचार व प्रसार केला पाहिजे. डॉक्टरांनी एक सामाजिक जबाबदारी म्हणून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केले पाहिजे.

**(लेखकद्वय संजीवनी हॉस्पिटल, मंगळवेढा येथे डॉक्टर आहेत.)**

●

---

**(पृष्ठ क्रमांक ६ वरुन)**

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आग्रहाने पुरस्कार केला, त्याचे फलित आपल्याला आणि जगाला दिसते आहे. सन १९४६ मध्ये नेहरूंनी पहिल्यांदा Scientific Temper वैज्ञानिक दृष्टिकोन ही संकल्पना उच्चारली. स्वातंत्र्यानंतर त्यांनी या संकल्पनेचा विस्तार केला. नेहरूंनी उभारलेल्या संशोधन संस्था, विद्यापीठे ही त्यांच्या वैज्ञानिक, विज्ञाननिष्ठ भूमिकेची उदाहरणे आहेत. 'Scientific Temper with humanism', नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे. त्याचा घटनेमध्ये अनुच्छेद ५१ (ल) नुसार अंतर्भाव केला आहे. तो असा... It shall be the duty every citizen of India to develop scientific temper, humanism and the spirit of inquiry and reform. इतकी सुस्पष्ट तरतूद घटनेत असताना त्या तरतुदीचा अवलंब, पालन न करणारे, त्याउलट अविचारी, अविवेकी, थोतांड असे काहीतरी बोलणारे आणि समाजाची दिशाभूल करणारे महाभाग आपल्याला दिसतात. काही लोकप्रतिनिधीसुद्धा काही बेजबाबदार भाकडगोष्टी सांगून अंधश्रद्धेस खतपाणी घालतात. या सर्वांना पायबंद घालण्यासाठी सकारात्मक उपाययोजना म्हणजे शिक्षणाच्या माध्यमातून विज्ञाननिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद, बुद्धिप्रामाण्यवाद रुजविणे हे होय.

**(लेखक शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक, प्रेरणादायी वक्ते व साहित्यिक आहेत.)**

●

---

**(पृष्ठ क्रमांक १२ वरुन)**

विकासात्मक मार्गाने आगेकूच करण्याऐवजी अंधारातच लोटण्याचे काम इथल्या शिक्षण व्यवस्थेमधून सत्ताधारी वर्ग करत असतात. कारण समाजाला अंधारात ठेवण्यामागे त्यांचे हितसंबंध दडलेले असतात. शिक्षण हे समाजाला मुक्तीकडे नेण्याचा मार्ग ठरू शकते. शिक्षणाद्वारे समाजात समता, न्याय, बंधुता रुजवली पाहिजे. समाजाला जुन्या रूढी-परंपरांच्या व अंधश्रद्धांच्या साखळदंडातून बाहेर काढण्याचे साधन म्हणून उपयोग करण्यात यावा. जगण्याचे नव-नवे मार्ग शोधले पाहिजे आणि मानवी जीवनमुक्तीच्या मार्गाने नेले पाहिजे; परंतु प्रत्यक्षात तसे होताना आपणास दिसत नाही. ही समाजासाठी अतिशय गंभीर बाब आहे.

**(डॉ. दिलीप चव्हाण हे स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड येथे इंग्रजीच प्राध्यापक आहेत.**

**प्रकाश वाघमारे हे स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड येथे संशोधक विद्यार्थी आहेत.)**

●



# प्रसारमाध्यमे : अंधश्रद्धा आणि अज्ञान उत्पादन

**डॉ. शिवाजी जाधव**
९८८११९१२२९

भारतात प्रसारमाध्यमांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि वेब माध्यमांच्या संख्यात्मक वाढीसोबतच गुणात्मक वाढीचा आग्रह धरणे गैर नाही. मात्र, ही माध्यमे एकमेकांशी स्पर्धा करण्याच्या नादात अतार्किक, अवैज्ञानिक, असंविधानिक आणि अमानवी संदेश देऊन राज्यघटना, कायदे आणि संकेतांना झुगारत असल्याचे चित्र आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी प्रसारमाध्यमांइतके योगदान कोणीच देऊ शकले नसते; परंतु प्रसारमाध्यमांनी ही संधी गमावली, असे खेदाने म्हणावे लागते.

विज्ञानाचे लाभ मिळाले, समाज विज्ञानवादी झाला का?

वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात झिरपण्यासाठी भारतीय राजकीय नेतृत्व प्रगल्भ असणे आवश्यक आहे. प्रारंभीच्या काळात पंडित नेहरू यांनी सातत्याने वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथामध्ये ते लिहितात, 'वैज्ञानिक दृष्टिकोन हा मानवी जीवनाचा एक भाग आहे. व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर वैज्ञानिक पद्धती वापरात आली पाहिजे. या पद्धतीमध्ये प्रश्न विचारणे, वास्तवाचे निरीक्षण करणे, गृहीतक मांडणे, त्याची चाचणी करणे, विश्लेषण करणे आणि संवाद साधणे आदींचा समावेश आहे.' नेहरू यांची ही भूमिका नीट समजून घेतली असती तर आजचे चित्र याहून अधिक चांगले असते. भारत सातत्याने विज्ञान आणि अलीकडे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात खूप वेगाने भरारी मारत आहे. मात्र समाजात आणि व्यक्तिगत पातळीवर अद्याप हा दृष्टिकोन जगण्याचा एक भाग बनू पाहात नाही. बहुसंख्य समाज अवैज्ञानिक आणि पारंपरिक दृष्टिकोनाच्या साहाय्याने जगत आहे. विज्ञानाचे भौतिक लाभ जरूर मिळाले; पण त्याने संपूर्ण समाज विज्ञानवादी झाला का? या प्रश्नाचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल.

आत्मनिर्भरतेला बुद्धिप्रामाण्याची जोड हवी.

भारताने २०२० साली 'विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष धोरण' जाहीर केले. 'शाश्वत विकासाच्या मार्गावर पुढे जाण्यासाठी, तसेच 'आत्मनिर्भर भारत' साध्य करण्यासाठी पारंपरिक ज्ञानप्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. यासाठी स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करणे आणि तळागाळातील नवप्रकल्पांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे', असे या धोरणात नमूद केले आहे. पारंपरिक पद्धती वापरायला हरकत नाही; परंतु त्या समकालीन वास्तवाशी जोडून घेणे आवश्यक आहे. पारंपरिक पद्धतीमधील प्रतिगामी आणि मागास दृष्टिकोन बाजूला सारून नव्या आधुनिक जगाच्या आव्हानांशी भिडण्याची क्षमता असणारे विवेकवादी दृष्टिकोनच देशाला पुढे घेऊन जाणार आहेत. शिक्षण संस्थांनी याकामी पुढाकार घेतला पाहिजे. आयआयटी, आयआयएममधून हा प्रयत्न होत असला तरी व्यापक समाजाचा विचार करता हे प्रयत्न खूपच तोकडे आहेत. सामाजिक आणि संस्थात्मक पातळीवर देशभर अनेक चांगले प्रयत्न होत आहेत. लोकविज्ञान चळवळीच्या माध्यमातून समाजात जाणीव जागृती निर्माण करण्याचे स्तुत्य प्रयत्नही सुरू आहेत. केरळ शास्त्र साहित्य परिषद, भारत ज्ञान- विज्ञान समिती, आसाम सायन्स सोसायटी, ओरिसातील विज्ञान प्रचार समिती, वुई द सेपियन्स, ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क, महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन समिती अशा काही संस्था समाजात विज्ञान आणि विवेक वाढीस लागावा म्हणून झटत आहेत. शिक्षण संस्थांमधूनही शिक्षकांनी मुलांमध्ये हा दृष्टिकोन रुजविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. वैज्ञानिक जाणीव निर्माण करणे हा घटनात्मक भाग आहे. त्या दृष्टीने त्याकडे गांभीर्याने पाहाणे आवश्यक आहे.

शिक्षण व्यवस्थेत विज्ञानवाद कसा रूजणार?

शिक्षण व्यवस्थेत अलीकडे प्रतिगामी आणि अवैज्ञानिक विषय घुसडणे सुरू झाले आहे. एनसीईआरटीच्या पुस्तकातून गुजरात दंगलीचा मुद्दा बाजूला होतो. फैज अहमद फैज यांच्या काही ओळी लुप्त होतात. दहावीच्या पुस्तकातून भारत-चीनमध्ये राष्ट्रवादाचा उदय हा घटक हटविला जातो. लोकशाही आणि विविधता, महत्त्वाचे लढे आणि चळवळी,

लोकशाहीसमोरील आव्हाने अशा काही मुद्यांना सोयिस्करपणे बगल दिली जाते. हे कमी म्हणून की काय, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक महनीय व्यक्ती असंविधानिक आणि अव्यवहार्य वक्तव्ये करतात. ज्योतिष विद्या ही विज्ञानापेक्षा महत्त्वाची आहे, अशी विधाने केली जातात. ज्योतिषविद्या आणि पौराहित्य कर्मकांड अभ्यासक्रमात समाविष्ट होते. एवढेच नाही, तर बनारस हिंदू विद्यापीठात 'भूतविद्या' अभ्यासक्रमाचा भाग होते. पुन्हा हे विज्ञान म्हणून खपविले जाते, ते सर्वात वाईट. काहीतरी शब्दच्छल करून त्याची सांगड विज्ञानाशी घालून काही लोकांना भ्रमित करता येते. मात्र ती वस्तुस्थिती असत नाही. कोणताही आधुनिक शोध किंवा सिद्धांत भारताच्या प्राचीन धर्मग्रंथांशी जोडला जातो. जगातले बहुतेक सर्व शोध भारतातच लागले असल्याचे विविध ग्रंथांच्या हवाल्याने सांगितले जाते. तरीही भारत अद्याप महासत्ता सोडून द्या, गेला बाजार आत्मनिर्भर तरी का होऊ शकला नाही, हे अनुत्तरीच राहाते. खरं तर आपण आत्ममग्न स्थितीत जगत आहोत. भारतीय समाज असा आत्मकेंद्री होणं घातक आहे. नव्या जगाशी भिडताना नवा दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. अर्थात, तो वैज्ञानिक कसोटीवर टिकणाराच असला पाहिजे.

लोकशाही व्यवस्थेत प्रसारमाध्यमांची जबाबदारी विचारात घेता ही माध्यमे विज्ञान प्रसाराचे काम सर्वाधिक जोमाने करू शकतात. केवळ माहिती देणे माध्यमांचे काम नाही. त्यासोबतच प्रबोधन करणे आणि चुकीच्या गोष्टींच्या विरोधात उभे राहाणे माध्यमांची नैतिक जबाबदारी आहे. मात्र वैज्ञानिक दृष्टिकोन सर्वदूर पोहचविण्यासाठी माध्यमांकडून पुरेसे प्रयत्न केले जात नाही, असे खेदाने नमूद करावे लागते. विशेषतः टी.व्ही. माध्यमातून स्वैरपणे अंधश्रद्धा पसरवल्या जात आहेत, हे सर्वात चिंताजनक आहे.

टी.व्ही.चे ताळतंत्र सुटले

टी.व्ही. माध्यमाचा समाजमनांवर मोठा प्रभाव आहे. १९६० च्या दशकात शैक्षणिक कारणासाठी देशात टी.व्ही. माध्यमाचा अत्यंत परिणामकारिरत्या उपयोग करून घेण्यात आला. ज्या लोकांना लिहिता-वाचता येत नाही, अशा खूप मोठ्या समूहांचे सामाजिक भान तयार करण्यात या माध्यमाचा मोलाचा वाटा आहे. राष्ट्रीय एकात्मता, विविधतेतून एकता, शैक्षणिक आणि ग्रामीण विकास यांसह अनेक चांगल्या बदलाला टी.व्ही. माध्यम कारणीभूत ठरले आहे. परंतु माहिती विकून पैसे मिळविण्याचा काळ सुरू होताच टी.व्ही. माध्यमाचे ताळतंत्र सुटले. यातून अनेक चुकीच्या आणि अनैतिक गोष्टी घडू लागल्या. सत्य हा माध्यमांचा प्राण आहे. पण सत्याशी फारकत घेऊन असत्य, अवैज्ञानिक आशयाचा टी.व्ही. माध्यमे पुरस्कार करू लागली. वास्तविक पाहाता, सर्वच माध्यमांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून तशा पद्धतीच्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे अपेक्षित आहे. पण हा दृष्टिकोन माध्यमांतून खूपच अभावाने दिसतो. तर्काधिष्ठित समाजव्यवस्थेसाठी असा दृष्टिकोन विकसित होणे अनिवार्य आहे. तथापि, माध्यमांतून व्यक्त होणारा आशय अनेकवेळा तर्कशून्य आणि वस्तुस्थितीपासून खूप दूर गेलेला दिसतो. यातील आश्चर्याची बाब म्हणजे, काही वृत्त वाहिन्या प्राईम टाईममध्ये भूता-खेतांच्या निरर्थक आणि हवेतील गोष्टी चघळत बसतात. बातम्या म्हणून असा आशय सादर करण्यात या वाहिन्यांना जराही संकोच वाटत नाही. अवैज्ञानिक, अतार्किक आणि मनघडण माहिती प्रेक्षकांच्या माथी मारण्याचा प्रकार कोणत्याही विवेकी माणसाला अस्वस्थ करणारा आहे. विशेष कार्यक्रमांच्या नावाखाली सुरू असलेला हा अनैसर्गिक खेळ चिंताजनक आहे. जाहिरातींच्या माध्यमांतूनही असेच खोटे दावे करून अंधश्रद्धेला चुचकारण्याचा प्रयत्न होत आहे.

खरं तर अंधश्रद्धेला टी.व्ही. वाहिन्यांनी चालना देणे कायद्याने गुन्हा आहे. शिवाय कार्यक्रम आणि जाहिरात प्रसारणाच्या आचारसंहितेचे उल्लंघनही आहे. केबल टेलिव्हिजन नेटवर्क कायदा, १९९५ च्या कलम ६(१)(जे) अनुसार, टी.व्ही. वाहिन्यांना अंधविश्वास किंवा अंधश्रद्धेला उत्तेजन देणारा कोणताही कार्यक्रम प्रसारित किंवा पुनर्प्रसारित करता येणार नाही. याच कायद्याच्या कलम ५(७) नुसार, टी.व्ही. वाहिन्यांवरून प्रसारित होणाऱ्या जाहिरातून कोणत्याही प्रकारचा सिद्ध होऊ न शकणारा किंवा चमत्कारावर आधारित असणारा दावा करता येणार नाही, असे नमूद केले आहे. असे असले तरी कार्यक्रम आणि जाहिरात संहितेकडे दुर्लक्ष करून अनेक टी.व्ही. वाहिन्या निखालस खोटे दावे करण्यात धन्यता मानत आहेत. ही बाब केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या लक्षात आल्याने मंत्रालयाने सर्व टी.व्ही. वाहिन्यांना कार्यक्रम आणि जाहिरातींची आचारसंहिता काटेकोरपणे पाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सूचना पहिल्यांदाच दिल्या गेल्या नाहीत.

यापूर्वी मंत्रालयाने २०१० आणि पुन्हा २०१३ मध्येही टी.व्ही. वाहिन्यांनी चमत्कार आणि अंधश्रद्धेला प्रोत्साहन मिळेल, असे कार्यक्रम आणि जाहिराती प्रसारित करू नये, असे बजावले होते. म्हणजे कायदा, आचारसंहिता आणि मंत्रालयाचे लेखी निर्देश या सगळ्यांकडे दुर्लक्ष करून टी.व्ही. वाहिन्यांकडून अज्ञान उत्पादनाचा धंदा तेजीत सुरू आहे. कधी संस्कृतीच्या, कधी परंपरेच्या तर कधी इतिहासाच्या नावाखाली बेछूटपणे तद्दन खोटी माहिती प्रेक्षकांच्या डोक्यात घुसवली जात आहे. यातून समाजात पलायनवादी मानसिकता तयार होण्याचा धोका आहे.

पलायनवादी मानसिकता आणि प्रसारमाध्यमे

भारतासारख्या देशात प्रत्येक नागरिक प्रयत्नवादी होण्यासाठी जाणीवपूर्वक सत्य माहिती पेरणे आवश्यक आहे. कोविड-१९ काळात संपूर्ण जग हतबल झाले. कोणतीही अलौकिक किंवा अचाट शक्ती माणसांचे प्राण वाचवू शकली नाही. संपूर्ण जगाला केवळ आणि केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनामुळेच लस मिळू शकली. शास्त्रज्ञ, संशोधक, डॉक्टर आदींच्या अथक आणि सामूहिक प्रयत्नांतून माणूस आत्मविश्वासाने पुन्हा जगू लागला आहे. टी.व्ही. माध्यमांनी यातून तरी धडा घ्यावा. चमत्कार आणि अंधश्रद्धा यातून भारतीय समाजाचे कधीच भले होणार नाही. प्रेक्षकांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन कदाचित संबंधित टी.व्ही. वाहिन्यांचा टीआरपी काही काळासाठी वाढून त्यांना जाहिराती बऱ्यापैकी मिळतील. परंतु माध्यमांचा चिकित्सक इतिहास लिहितेवेळी अशा टी.व्ही. वाहिन्यांची नोंद समाजविघातक कृत्यांच्या यादीत होईल. हे पातक टाळायचे असेल, तर टी.व्ही. वाहिन्यांनी व्यापक समाजहित डोळ्यांसमोर ठेवून देशाला तारणारा वैज्ञानिक दृष्टिकोन निर्धारपूर्वक जोपासला पाहिजे.

अंधश्रद्धा पसरवणाऱ्या विविध जाहिरातींवर न्यायालयानेही आक्षेप नोंदवले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने हनुमान चालीसा यंत्राची जाहिरात करणाऱ्या चार टी.व्ही. वाहिन्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले होते. ब्लॅक मॅजिक कायद्याच्या कलम ३ नुसार अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे साहित्य प्रसारित करणेही गुन्हा आहे. या कलमानुसार तर्कविसंगत माहिती प्रसारित करणाऱ्या टी.व्ही. वाहिन्याही ब्लॅक मॅजिक कायद्याच्या कलम ३ अंतर्गत जबाबदार ठरतात, असे न्यायालयाने नमूद केले होते. एवढेच नाही, तर अशा खोट्या जाहिरातींना सर्वसामान्य लोक बळी पडू शकतात. त्यामुळे पुढील काळात अशा जाहिराती टी.व्ही. वाहिन्यांवरून प्रसारित होणार नाहीत, याची दक्षता घेण्यासाठी राज्य सरकारने विशेष कक्ष निर्माण करावा, असे निर्देशही खंडपीठाने दिले होते.

अंधश्रद्धा, अफवांचे कारखाने

भारतातील डिजिटल माध्यमे तर अपप्रचार, खोटी माहिती आणि अंधश्रद्धा पसरविणारे घातक कारखानेच आहे. अफवा पसरवून समाजात अशांतता माजविण्यात या माध्यमांचा हात कोणीच धरू शकणार नाही. व्हॉट्सॲप हे माध्यम यासाठी सर्वात कुख्यात आहे. कोविडच्या काळात या माध्यमांच्या अफवा प्रसवण्याच्या अफाट शक्तीचा वाईट अनुभव देशाने पाहिला आहे. कोविडच्या संसर्गापासून रोखण्यासाठी गोमूत्र प्राशन करण्याचा कार्यक्रम पश्चिम बंगालमध्ये जाहीरपणे सुरू करण्यात आला. यासंदर्भात अवैज्ञानिक माहिती सोशल मीडियातून पोहोचली. गाईचे शेणाने शरीर सारवल्याने कोविडपासून बचाव होतो, अशी आणखी एक अफवा पसरवली होती. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. मात्र, मुद्रित, इलेक्ट्रॉनिक किंवा वेब अशा सर्वच माध्यमांतून मोठ्या प्रमाणात अफवा, अमानवी आणि अनैसर्गिक तसेच विज्ञानाच्या कसोटीवर न उतरणाऱ्या अनेक प्रकारची निरुपयोगी माहिती प्रसारित केली जात आहे.

विज्ञाननिष्ठ समाज निर्मितीसाठी विज्ञानाची कास धरणारी प्रसारमाध्यमे असावी लागतात. यासाठी प्रसारमाध्यमातील काम करणारा प्रत्येक घटक विज्ञाननिष्ठ आणि तर्कनिष्ठ असला पाहिजे. अघोरी शक्ती आणि कर्मकांडावर पोसणारा पत्रकार कोणत्याही टप्प्यावर समाजात विवेकाची पेरणी करू शकणार नाही. प्रसारमाध्यमांकडून काही अपेक्षा करायच्या असतील तर माध्यमात काम करणाऱ्या घटकांच्या प्रबोधनावर भर दिला पाहिजे. त्यांना विज्ञान, विवेक आणि तर्क आदींची जाणीव करून दिली पाहिजे. तरच काही प्रमाणात माध्यमातील आशय बुद्धिप्रामाण्याशी सुसंगत येतील. अन्यथा, सध्याचे कुतर्कट असेच चालू राहील. किंबहुना ते आणखी उग्र स्वरूपात पुढे आल्यास आश्चर्य वाटणार नाही.

**(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत.)**

●



# खगोलविज्ञान आणि फलज्योतिष

**डॉ. नितीन शिंदे**
९८६०४३८२०८

शालेय जीवनापासून महाविद्यालयीन स्तरापर्यंत खगोलविज्ञानविषयक ग्रह, तारे, रास, नक्षत्र, ग्रहणे, विश्व, आकाशगंगा, दुर्बिण इत्यादी संबंधीची इत्यंभूत माहिती पाठ्यपुस्तकामध्ये आहे. 'तारे लुकलुकतात; पण ग्रह लुकलुकत नाहीत' आणि 'Twinkle Twinkle Little Star' ही कविता प्रत्येकाच्या मनात आजही घर करून राहिलेली आहे. असं असलं तरी आपण ग्रह पाहिलेत का? दुसरा सूर्य पाहिलाय का? असे प्रश्न विचारल्यानंतर 'होय' असे उत्तर येण्याची शक्यता फारच कमी. रात्रीच्यावेळी आकाशात प्रत्यक्षात पाहिले तर केवळ एवढ्या फरकावरून ग्रह, तारे ओळखता येत नाहीत, याची प्रचिती प्रत्येकाने घेतलेली आहे. रात्रीच्यावेळी सगळ्याच चांदण्या लुकलुकल्यासारख्या दिसतात. 'आकाशामध्ये ग्रह दिसतात आणि संध्याकाळी आपण आकाशाचे निरीक्षण करून त्यांचा अभ्यास करूया' हे शालेय अभ्यासक्रमातील वाक्य पुस्तकातच राहिले आहे. ग्रह-ताऱ्यांची ओळख शिक्षण व्यवस्थेने प्रत्यक्षात करून दिलेली नसल्यामुळे आज व्यावहारिक जीवनामध्ये कडक मंगळ, साडेसाती, आठवा गुरू, गुरुपुष्यामृतयोग, कालसर्पयोग इत्यादींची चलती आहे. भीतीपोटी ग्रह-ताऱ्यांवर आधारित असलेली कर्मकांडं शिकलेले असोत अथवा अशिक्षित, आजही भावनिकतेने करत आहेत.

शालेय वयामध्येच जर बुध, शुक्र, मंगळ, शनि, गुरू हे ग्रह उघड्या डोळ्यांनी दाखविले असते, तर फलज्योतिषाऐवजी खगोलाचा प्रसार होण्याची दाट शक्यता होती. सन १६०९ मध्ये गॅलिलिओने दुर्बिणीतून चंद्रावरचे खड्डे, शुक्राच्या कला, गुरूचे उपग्रह, सूर्यावरचे डाग आदींचे निरीक्षण केले. पण आजही शहरी अथवा ग्रामीण भागातील जवळजवळ ९९ टक्के जनतेने हे खगोलीय आविष्कार पाहिलेले नाहीत. मुख्यत्वे दुर्बिणच मुलांच्या हाताला लागलेली नाही हे वास्तव आहे. निसर्गातील अनेकविध घटना मानवाला समजून घेण्यासाठी जिज्ञासा आणि कुतूहल कारणीभूत ठरलेले आहेत. यासाठी आवश्यक असणारी चिकित्सकवृत्ती लहान मुलांमध्ये ओतप्रेत भरलेली असते. खगोल विज्ञानामध्ये लहान मुलांना कमालीची आवड असल्याचं जाणवतं. परंतु त्यांचे खगोलविषयक प्रश्न अनुत्तरित राहातात. सूर्य सकाळी तांबडा का दिसतो? आकाशाचा रंग निळाच का? ग्रहण हे पाळण्यासाठी की पाहाण्यासाठी? शनीला कडी का असते? ग्रह दिसतात का? पौर्णिमा आणि अमावास्या कशा होतात? एक ना अनेक प्रश्नांचा मारा मुलं करत असतात. आपण जर मुलांच्या प्रश्नांची उत्तरं दिली, तर ती आणखी प्रश्न निर्माण करत जातात. पण मुलांच्या या चिकित्सकवृत्तीला पालकवर्ग आणि शिक्षकवर्ग जाणीवपूर्वक अपुरा पडतो. उत्तर देण्याच्या भानगडीत न पडता, मुलांना गप्प बसवण्याचा मार्ग निवडला जातो. हे प्रश्न थोडेच परीक्षेला विचारले जाणार आहेत का? असे म्हणून मुलांच्या चिकित्सकवृत्तीला खो घातला जातो. पण हे एवढ्यावरच थांबत नाही. हीच लहान मुलं कालांतराने पालकांच्या भूमिकेत गेल्यानंतर ग्रह-ताऱ्यांशी निगडित वेगळेच प्रश्न विचारतात. कडक मंगळ म्हणजे काय? साडेसाती लागते म्हणजे काय होतं? गंड योग म्हणजे काय? भविष्य कसं खरं ठरतं? वैरवर्ग कसा ठरवतात? कालसर्पयोग कसा काढतात? पत्रिका कशी जुळवतात? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती होते. खगोलविज्ञानाच्या माहितीमध्ये रस न घेता, जाणीवपूर्वक फलज्योतिषाच्या अंगाने आपल्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली (इग्नू) ने जुलै २०२१ पासून दूरशिक्षणाद्वारे तरुणाईला नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने एम. ए. ज्योतिष अभ्यासक्रम सुरू केलेला आहे. सदर अभ्यासक्रमामध्ये ग्रह-ताऱ्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम, पंचांग, मुहूर्त, कुंडली, ग्रहणवेध आदींचा समावेश आहे. सन २००१ मध्ये युजीसीच्या माध्यमातून ज्योतिष अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी घेतलेला होता. परंतु ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ

डॉ. जयंत नारळीकर, प्रो. यशपाल आणि इतर अनेक वैज्ञानिकांनी विरोध केल्याने सदर प्रस्ताव रद्द करावा लागला होता. ही पार्श्वभूमी असताना देखील २०२१ मध्ये पुन्हा एकदा हा विषय आणण्याच्या हेतूबद्दल शंका निर्माण होते. सर्वसामान्यांच्यावर प्रचंड पगडा असलेला हा अवैज्ञानिक विषय संस्कृती आणि परंपरेच्या नावाखाली आजही आपलं अस्तित्व टिकवून आहे, हे भीषण वास्तव आहे.

यापूर्वीच अमेरिकेतील 'द ह्युमॅनिस्ट' मासिकाच्या सन १९७५ मधील अंकात डॉ. एस. चंद्रशेखर आणि इतर अठरा नोबेल पुरस्कारप्राप्त शास्त्रज्ञांसहित १८६ प्रथितयश शास्त्रज्ञांनी स्वत:च्या स्वाक्षऱ्यांनिशी फलज्योतिषविरोधी निवेदन प्रसिद्ध केले होते. अति दूर असणारे तारे किंवा ग्रह मानवी जीवनावर प्रभाव टाकतात, हे असत्य असून फलज्योतिषाच्या भाकितांना कोणताही शास्त्रीय आधार नाही, असे त्यांनी निवेदनात स्पष्टपणे नमूद केले होते. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) तरुणाईला बरोबर घेत चंद्राला अथवा मंगळाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. असं असताना इग्नूसारखं विद्यापीठ त्याच तरुणाईला बरोबर घेत, खगोलविज्ञानावर बिलकुल न टिकणारी ज्योतिषाची पदवी बहाल करत आहे. पदवी प्राप्त करून हीच तरुणाई तमाम समाजाला कडक मंगळ आणि शनिच्या साडेसातीत अडकवत त्याचं मानसिक, आर्थिक आणि शारीरिक शोषण करणार, हे निर्विवाद सत्य आहे. शिक्षणातून शहाणपण येतं असं म्हणतात. परंतु अशा प्रकारचं शिक्षण समाजाला अंधश्रद्धेच्या खोल गर्तेत ढकलून देईल, यात तिळमात्रही शंका नाही.

'ज्योतिष' आणि 'फलज्योतिष' या दोनही शब्दांचे अर्थ एकच असल्याचा सर्वसामान्यांचा समज आहे. रात्रीच्यावेळी आकाशात दिसणाऱ्या चांदण्यांचा म्हणजेच ज्योतींचा वैज्ञानिक अभ्यास करण्यासाठी आपल्या पूर्वजांनी 'ज्योतिष' या शाखेची निर्मिती केली. पिढ्यान्‌पिढ्यांच्या निरीक्षणानंतर आकाशातील खगोलीय वस्तूंमधील गणितीय संगती शोधून काढण्यात मानवाला यश आले. असंख्य चांदण्यांच्या पार्श्वभूमीवर काही चांदण्या आपली जागा बदलतात, असे निदर्शनास आले. सदर चांदण्यांना पाश्च्यात्त्यांनी 'भटके' अर्थात 'प्लॅनेट' तर भारतीयांनी 'ग्रह' म्हणून संबोधले. आकाशामध्ये आपले स्थान न बदलणाऱ्या चांदण्यांना तारे म्हणून ओळखलं गेलं. आकाशातील या ताऱ्यांचे राशींच्या रूपाने पाश्च्यात्त्यांनी बारा समूह, तर भारतीयांनी नक्षत्रांच्या रूपाने सत्तावीस तारकासमूह तयार केले. सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र आणि राशींचा परस्परसंबंध सांगणारे शास्त्र म्हणून 'ज्योतिष' ओळखले जात होते. आजचे तथाकथित फलज्योतिष या व्याख्येमध्ये बिलकूल बसत नाही.

राजेशाहीच्या कालखंडामध्ये ज्योतिषांनी ग्रह-ताऱ्यांचा प्रभाव मानवी जीवनावर पडतो, असे सांगण्यास सुरुवात केली आणि ज्योतिषाची जागा फलज्योतिषाने घेतली. ज्योतींच्यामुळे मानवास मिळणारे 'फल' म्हणून 'फलज्योतिष'. मान- सन्मानाबरोबरच आर्थिक फायदा होतो, असं लक्षात आल्यानंतर फलज्योतिषांनी आपलं बस्तान बसवण्यास सुरुवात केली. आजचे भविष्य सांगणारे भविष्यवेत्ते स्वत:ला ज्योतिषी समजतात. प्रत्यक्षात ते फलज्योतिषी आहेत हे वास्तव लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.

एकविसाव्या शतकात शालेय अथवा महाविद्यालयीन स्तरावर मिळणारे ग्रह-ताऱ्यांचे ज्ञान ज्योतिषांना असलेल्या ज्ञानाच्या तुलनेत अत्यंत आधुनिक आहे. आजचे विद्यार्थी दीर्घिका, कृष्णविवर, सुपरनोव्हा, गुरुत्वीय लहरीं इत्यादी विषयांचा अभ्यास करत आहेत. असे असले तरी सर्वसामान्यांना मात्र पंचांग आणि ज्योतिष या विषयात प्रचंड रस आहे. ज्योतिषांमध्ये वापरण्यात येत असलेल्या संकल्पना अवैज्ञानिक आहेत आणि त्यांचा ऊहापोह केल्याशिवाय फोलपणा लक्षात येणार नाही. वानगीदाखल काही संकल्पनांचा वेध घेऊया.

ज्योतिषांचा अभ्यास नवग्रह संकल्पनेशी निगडित आहे. नवग्रह म्हणजे नऊ ग्रह. त्यांचा अभ्यास बुध, शुक्र, मंगळ, गुरू, शनी, सूर्य, चंद्र, राहू आणि केतू या नऊ ग्रहांच्याभोवती फिरतो. यांच्या ग्रहांच्या संकल्पनेत पृथ्वी बसत नाही. चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह, तर सूर्य हा तारा असूनही ग्रह म्हणून त्यांची मान्यता! राहू आणि केतू हे ग्रह नसून काल्पनिक बिंदू आहेत, पण यांच्यादृष्टिने ग्रह. व्यक्तीचं भरणपोषण करणाऱ्या पृथ्वीला ग्रहाचा दर्जा यांनी दिलेला नाही. युरेनस आणि नेपच्युनला ते ग्रहांच्या व्याख्येत घेत नाहीत. शाळेत असताना आठ ग्रह शिकणारा मुलगा ज्योतिषी झाल्यानंतर समाजाला नऊ ग्रह

शिकवणार. ते पण वेगळेच. ज्योतिष विषय विद्यापीठात शिकवण्याचं समर्थन करणारे असं म्हणतात की, कला शाखेत हा विषय शिकवला तर काय बिघडलं? विज्ञानात आठ ग्रह असतील, तर कला शाखेत ते नऊ होतात, असं तर समर्थकांना यानिमित्ताने सुचवायचं नसेल ना!

युरेनस, नेपच्यून हे ग्रह उघड्या डोळ्यांनी दिसत नाहीत. दुर्बिणीच्या शोधानंतर या दोन ग्रहांचा शोध अनुक्रमे सन १७८१ आणि सन १८४६ मध्ये लागला. त्यानंतर ज्योतिषांनी यांना पत्रिकेत स्थान दिले. पाश्च्यात्त्यांनी शोधलेल्या ग्रहांचा वापर करण्याचा अधिकार यांना संस्कृतीने दिला की परंपरेने? आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र परिषदेने प्लुटोचे ग्रहपद सन २००६ मध्ये काढून घेतलेले असून त्याला 'बटु ग्रह' म्हणतात. स्वत:चे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी ज्योतिषांनी अजूनही त्याला पत्रिकेमध्ये ठेवलेले आहे. हे नवग्रहांची संकल्पना मांडतात; पण प्रत्यक्षात बारा ग्रहांचा वापर करतात. बुध, शुक्र, मंगळ, गुरू, शनी, सूर्य, चंद्र, राहू, केतू, युरेनस, नेपच्यून आणि प्लुटो. यात पृथ्वी नाही हे लक्षात घ्या. मुख्य म्हणजे विज्ञानाने ग्रहाचा दर्जा दिलेल्या पृथ्वीवर राहून ते त्यांनी मुक्रर केलेल्या बारा ग्रहांचा वापर करत आहेत. धन्य त्यांचा ग्रहांचा अभ्यास.

रास ही संकल्पना पाश्च्यात्त्यांची आहे, तर नक्षत्र ही संकल्पना भारतीयांची आहे. भारतीयांचे सर्व सण आणि उत्सव नक्षत्रांवर अवलंबून आहेत. असं असताना ज्योतिषी व्यक्तीची पत्रिका तयार करताना मात्र बारा घरांची करतात. बारा घरं बारा राशींसाठी असतात. ज्योतिषांना आपल्या अभ्यासाचा अभिमान असेल, तर त्यांनी पत्रिका सत्तावीस घरांची करायला हवी होती.

रास किंवा नक्षत्र म्हणजे आकाशातील ताऱ्यांचे समूह. तारे म्हणजे दुसरे सूर्य. आकाशातील बारा स्टॉपच्या पार्श्वभूमीवर ग्रह फिरतात. सर्वात दूरचा बटु ग्रह प्लुटो आपल्यापासून सहाशे कोटी तर मंगळ बावीस कोटी किलोमीटर अंतरावर आहे. शेजारच्या घरात काय चाललेलं आहे, ते आपल्याला समजत नाही आणि इथं ज्योतिषी बावीस कोटी किलोमीटर अंतरावरील मंगळाचा हवाला कसा घेत असतील? भारताचे मंगळयान मंगळाच्या कक्षेपर्यंत पोहोचायला तीनशे दिवस लागले, हे कडक मंगळवाल्यांनी लक्षात घ्यायला हवे.

तारे प्रचंड दूर आहेत. पंधरा कोटी किलोमीटर अंतरावरील आपल्या सूर्यापासून प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचायला जवळपास आठ मिनिटे लागतात. याचा अर्थ, आपण नेहमी आठ मिनिटांपूर्वीचा सूर्य पाहात असतो. आठ मिनिट जुना. ज्येष्ठा नावाच्या ताऱ्यापासून प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचायला नऊशे वर्षे लागतात. याचा अर्थ, आज रात्री ज्येष्ठा तारा आपण पहिला, तर तो नऊशे वर्षांपूर्वीचा असणार. तीन ज्येष्ठ आले की लग्न करत नाहीत. पण ते ज्या ताऱ्याशी निगडित आहे तो ज्येष्ठाचा तारा सन ११२२ मधला आहे. कशाला विघ्न आणेल. मुलगा आणि मुलगी ज्येष्ठ म्हणजे मोठे आणि ज्येष्ठ महिना असा योग आला, तर त्याला 'त्रिज्येष्ठा' म्हणत लग्नाला परवानगी न देणारी ही व्यवस्था. यातील ज्येष्ठ महिना तेवढा ज्येष्ठा ताऱ्याशी संबंधित आहे. इतर दोन ज्येष्ठ हे सर्वात मोठा या अर्थाने आहेत. तीन ज्येष्ठांचा एकमेकांशी कोणताही संबंध नसताना केवळ समाजाला आपल्या मुठीत ठेवण्यासाठीचे योगाचे प्रयोजन. हा असला अतार्किक अभ्यास न केलेलाच बरा.

ध्रुव ताऱ्याकडून प्रकाश आपल्यापर्यंत पोहचायला तीनशे पंचाहत्तर वर्षे लागतात. याचा अर्थ, आज रात्री ध्रुव तारा आपण पहिला, तर तो तीनशे पंचाहत्तर वर्षांपूर्वीचा असणार. आज २०२२ मध्ये पाहिलेला ध्रुव तारा प्रत्यक्षात सन १६४७ सालातला आहे. अचंबित झालात ना! थोडक्यात, रात्रीच्यावेळी आकाशात दिसणारे तारे हजारो वर्षांपूर्वीचे आहेत. ज्योतिष मंडळींनी या हजारो वर्षांपूर्वीच्या ताऱ्यांचा संबंध मानवी सुख-दु:खाशी लावलेला आहे. रात्रीच्या आकाशातील हे फार-फार वर्षांपूर्वीचे तारे आपल्या आयुष्यात डोकावण्याची बिलकुल शक्यता नाही.

दैनंदिन जीवनात रात्री बारा वाजून गेल्यांनतर नवीन दिवसाची सुरुवात होते. ज्योतिषांच्यादृष्टीने दिवसाची सुरुवात सूर्योदय झाल्यानंतर होते. सूर्योदय ते सूर्योदय असा त्यांचा दिवस असतो. हा अभ्यास व्यवहारात अमलात आणणे ज्योतिषाचे समर्थन करणाऱ्यांना तरी झेपेल काय. एवढंच नाही, भारतामध्ये पूर्वेकडे सूर्योदय लवकर होतो, तर पश्चिमेला उशिरा. पश्चिम बंगाल, जम्मू काश्मीर, राजस्थान, मध्यप्रदेश अशा सर्वच राज्यांतील ज्योतिषांच्या दिवसाची सुरुवात वेगवेगळ्या वेळी होणार. हे विचित्र वाटत नाही का?

ज्योतिषांच्या संशोधनानुसार सूर्यमालेचा केंद्रबिंदू सूर्य नसून पृथ्वी आहे. शालेय मुलं सूर्य केंद्रबिंदू आहे असं शिकतात. ज्योतिषी झाल्यानंतर हाच मुलगा पृथ्वी केंद्रबिंदू आहे असं सांगत फिरणार. सूर्य केंद्रबिंदू आहे असं सांगणाऱ्या गॅलिलिओला सतराव्या शतकात तुरुंगवासाची शिक्षा झालेली होती. एकविसाव्या शतकात भारतात कदाचित ही परिस्थिती निर्माण होऊ शकते.

ज्योतिषांना महत्त्वपूर्ण ठरणारी जन्मवेळ ही सापेक्ष आहे. डॉक्टर-नर्सचे घड्याळ, दवाखान्यातील घड्याळ, टी.व्ही.-रेडिओचे घड्याळ, आई-वडिलांचे घड्याळ यापैकी कोणती वेळ ग्राह्य धरणार. तसं पाहिलं तर बाळाचा जन्म नऊ महिन्यांपूर्वीच झालेला असतो. तसेच मुलं रॉकेटने उड्डाण केल्यासारखं क्षणार्धात पृथ्वीवर प्रवेश करत नाहीत. बराच कालावधी त्यासाठी लागतो. जन्मवेळ कोणती गृहीत धरायची. मुलाचे पाय बाहेर आल्यानंतर की, डोकं बाहेर आल्यानंतर. काहीवेळा मातेच्या आणि बाळाच्या सुरक्षिततेसाठी सिझरीन करावे लागते. ते केव्हा करायचे हा निर्णय पूर्णपणे डॉक्टरांवर अवलंबून असतो. असं असेल तर, डॉक्टरांनी मुलाच्या जन्माची  वेळ स्वत: ठरवली असा होतो. जन्मवेळेवर पत्रिका काढून भविष्य सांगणाऱ्यांनी याबाबत काही विचार केल्याचं ऐकिवात नाही. कारण पालक मंडळी जी जन्मवेळ सांगतात त्यावरच पत्रिकेचा डोलारा उभा केला जातो, हे वास्तव आहे.

शालेय अभ्यासक्रमामध्ये ग्रह-ताऱ्यांचा आणि ग्रहणांचा मानवी जीवनावर परिणाम होत नाही, असं शिकवलं जातं. ज्योतिष पदवीनंतर ग्रहणांचा परिणाम होतो, असं समाजमनावर बिंबवणार. शाळेत एक आणि विद्यापीठात दुसरंच. विज्ञान शाखा वास्तव सांगणार आणि कला शाखा वेगळंच. ज्या वयात चिकित्सकवृत्ती आणि जिज्ञासा ठासून भरलेली असते त्या शालेय वयात मुलं ग्रह-ताऱ्यांचा वास्तव अभ्यास करणार. ज्यावेळी ती आपल्या चरितार्थाचा विचार करणार, त्यावेळी चिकित्सेला तिलांजली देत समाजाला आभासी दुनियेत नेणार. विद्यापीठाच्या सहकार्याने. हा विरोधाभास आहे!

फलज्योतिषाचा अभ्यास नसताना त्याला विरोध करणे योग्य नव्हे, असे काही जणांचे मत असते. त्यांच्यासाठी पत्रिका जुळवण्याचा प्रकार थोडासा उलगडून दाखवतो. छत्तीस गुणांच्या या परीक्षेत अठरा गुण पडले की उत्तीर्ण. पन्नास टक्क्याला पासिंग. यासाठी मुलामुलींना लेखी, तोंडी, नीट, जेईई अथवा  सीईटी अशा कोणत्याही परीक्षेला समोर जावं लागत नाही. पत्रिका दिली की, ज्योतिषी आपल्या हिमतीवर परीक्षा घेतात आणि मार्क देऊन रिकामे होतात. सदर परीक्षा आठ विभागांमध्ये विभागलेली आहे. त्यापैकी 'वर्णगुण' विभागानुसार  मुलामुलींची चार वर्णांत विभागणी केलेली आहे. विप्र, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र. या निराधार विभागणीचे शुद्राला वाईट वाटेल की नाही? विप्र म्हणजे ब्राह्मण! हे सुज्ञाला सांगायला नको. वरच्या वर्णातील मुलाने त्याच्या अथवा खालच्या वर्णातील मुलीशी लग्न केल्यास एक गुण. मुलीनं असं केलं, तर मात्र शून्य गुण. शुद्र मुलाला त्यांनी पर्यायच ठेवलेला नाही. शुद्र मुलाला फक्त आणि फक्त शुद्र मुलगीच. वर्णगुणाचे टेबल पंचांगात अधिकृतपणे दिलेलं आहे. ते पाहिल्यानंतर तळपायाची आग मस्तकालाच भिडायला पाहिजे. विचार करणाऱ्यांच्या! पण हे होत नाही. कारण गुण कसे जुळवतात याची तसूभरही कल्पना समाजाला नाही.

| मुलगी | मुलगा | | | |
|---|---|---|---|---|
| | विप्र | क्षत्रिय | वैश्य | शुद्र |
| विप्र | १ | ० | ० | ० |
| क्षत्रिय | १ | १ | ० | ० |
| वैश्य | १ | १ | १ | ० |
| शुद्र | १ | १ | १ | १ |

संस्कृतीच्या अधिकारामुळे वरिष्ठ जातीतील मुलाने कनिष्ठ जातीतील मुलीशी लग्न केले तर चालते, पण मुलीला मात्र परवानगी नाही. आर्ची आणि परश्याचा सैराट! सर्वसामान्यांच्या मनात सैराटने जे घर करून ठेवलेलं आहे, ते केवळ या एका गुणामुळेच. लिखित साहित्य कायमस्वरूपी समाजमन कसं बधीर करून टाकते, याचा हा उत्तम नमुना. पुरुषांमध्येही ब्राह्मण मुलाला उच्चस्थान! इग्नू विद्यापीठातून बाहेर पडणारे भावी ज्योतिषी संस्कृतीच्या नावाखाली भारतामध्ये वर्णव्यवस्था घट्ट करणार! वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि स्त्री-पुरुष असमानतेचं समर्थन करणारा हा प्रकार संविधान आणि लोकशाहीविरोधी आहे. ज्योतिषाचे समर्थन करणाऱ्यांना ही गुण व्यवस्था मान्य आहे का? हा मुख्य सवाल आहे. लग्न ठरविताना ग्रह-ताऱ्यांवर

आधारित असलेला ३६ गुण जुळवण्याचा ठेका घेतलेल्या तथाकथित गुरुजींचा सल्ला घेतल्याशिवाय घोडं पुढं जात नाही. शाळेत शिकवणाऱ्या गुरुजींना मास्तर म्हणून हिणवणारा समाज फसवणूक करणाऱ्यांना मात्र आदराने गुरुजी म्हणून सन्मान देतो, हे अनाकलनीय आहे.

ग्रह, तारे आणि नक्षत्रांची पूर्वजांनी जमा केलेली माहिती निश्चितच वैज्ञानिक होती. मात्र काही स्वार्थी लोकांच्या मनात सदर माहितीचा दुरुपयोग करण्याची ऊर्मी आली आणि फलज्योतिषाने जन्म घेतला, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. सत्तावीस वजा नऊ किती? असा प्रश्न कोणालाही विचारला, तर उत्तर अठराच येणार. परंतु हाडाच्या शेतकऱ्याचे या प्रश्नासाठीचे उत्तर मात्र शून्य असते. याचं कारण दडलेलं आहे नक्षत्रांशी. शेतकऱ्याच्या दृष्टीने मृग नक्षत्र लागलं की, पावसाळा सुरू आणि हस्त लागलं की, पावसाळा समाप्त. मृग ते हस्त या दरम्यान नऊ नक्षत्रं येतात. सत्तावीसमधून पावसाची नऊ नक्षत्र वजा केली, याचा अर्थ पाऊसच पडणार नाही. मग पिकणार काय? म्हणून शेतकरी शून्य म्हणतो. हे शेतकऱ्याचं गणित त्याच्यादृष्टीने बरोबरच होतं. अर्थात, पाऊस नक्षत्रावर अवलंबून नाही, परंतु त्याने शेतीचा संबंध आकाशातील ताऱ्याशी जोडला. पेरणी कधी करायची, कापणी कधी करायची, पाऊस कधी पडणार आणि कधी संपणार हे आडाखे तो आकाशातील तारे बघून बांधत होता. हे भान त्याला ऋतुचक्राचे ज्ञान देत होतं. शेतीसाठी ते आवश्यक होतं. दुसऱ्याला फसवण्यासाठी त्याने या माहितीचा कधीही वापर केला नाही. शेतकऱ्याचा ग्रह-ताऱ्यांचा अभ्यास फारच चांगला होता. परंतु लेखनी त्याच्या हातामध्ये नव्हती. लेखनी ज्यांच्या हातामध्ये आली त्यांनी या ग्रह-ताऱ्यांचा दुरुपयोग केला आणि समाजाला फसवण्याचं काम केलं. आजही मुहूर्त बघायला शेतकरी त्यांच्याकडे जातोय. खरं म्हणजे जाण्याची गरज नव्हती. अहो, एवढंच काय, म्हैस हरवली तरी त्यांच्याकडे जातात. कुठे गेली म्हणून विचारायला? ते महाशय इकडची तिकडची पानं उलगडत उत्तर दिशेला गेलेली आहे. शोधा म्हणजे सापडेल, असं सांगतात. वास्तविक पाहाता, म्हैस काय त्यांना सांगून जाते का, की मी उत्तरेला निघालेली आहे, ते आले की त्यांना सांगा. विचारच करायचा नसेल, तर असे पर्याय सुचतात. उत्तर देणारे पण न गडबडता उत्तर देतात. कारण मामला आर्थिक असतो. विनाकष्टाचा!

अंतराळात झेप घेत, दुर्बिणीच्या साहाय्याने शोध लावत, नोबेल पारितोषिक पटकावत, भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारी तरुणाई आपणाला निर्माण करायची आहे की, समाजाचं शोषण करणारी. याचा विचार पालक म्हणून आपणाला करावाच लागेल. काय बिघडलं ज्योतिष विषय शिकवला म्हणून असं म्हणणाऱ्यांनी भावी पिढ्यांचा विचार करण्याची नितांत गरज आहे. अन्यथा, त्या आपल्याला कधीच माफ करणार नाहीत. अभ्यासक्रम ठरवताना संशोधन, विश्वासार्हता आणि सत्यतेला महत्त्व दिले जाते. ज्योतिष या पातळीवर अजिबात टिकत नाही. अवैज्ञानिक ज्ञान तरुणाईला देऊन आपण काय साध्य करणार आहोत. शैक्षणिक धोरणाच्या गाभा घटकात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा समावेश केलेला आहे आणि इथे मात्र नेमका उलट व्यवहार. आर्थिक विवंचना आणि बेरोजगारीतून मार्ग काढण्यासाठी समाजाला पुन्हा एकदा त्याच खाईत लोटण्याचं हे षड्यंत्र आहे. संस्कृती आणि परंपरेतून आलेलं ज्ञान समाजाला उन्नत करणारं आणि पुढे घेऊन जाणारं असेल, तर ते देण्याला कोणाचीच हरकत नाही. अंधश्रद्धेचा प्रसार करणारे ज्ञान समाजाला अविवेकी बनवेल, यात तिळमात्र शंका नाही. म्हणून माणसाला गुलामीत ढकलणारा आणि शोषणावर आधारलेला हा अभ्यासक्रम समाजानेच नाकारला पाहिजे. उद्याच्या उज्ज्वल भारतासाठी आपण सर्वजण मिळून खगोलविषयक जाणिवा वृद्धिंगत करूया आणि फलज्योतिषाच्या फसवणुकीपासून समाजाची मुक्तता करूया.

**(लेखक कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर येथे भौतिकशास्त्राचे प्राध्यापक व अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत.)** ●

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका या आपल्या मासिकाचे जाहीरातदार, देणगीदार व वर्गणीदार यांचे मनःपूर्वक स्वागत आपल्या सूचना आणि प्रतिक्रिया कळवाव्यात. तसेच आपल्या मासिकाच्या अंकाबाबत काही सूचना किंवा काही अडचणी असतील, तर सोबतच्या मोबाईल नंबरवर संपर्क करा.

**अजय भालकर**
व्यवस्थापकीय संपादक
९३५९०८०८२०



# शिक्षणातून अंधश्रध्दा निर्मूलन

**प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार**
९४२२५९२१११

अविज्ञानाचा आणि अविवेकाचा अंकुर मानवी मेंदूत जन्म घेतो आणि तो मनाला व्यापून टाकतो. मानवी मन दोन पद्धतीने तयार होते. एक, सामाजिक व कौटुंबिक संस्कारातून व दोन, शाळेत व शाळेबाहेर शिक्षण घेण्यातून. त्यामुळे शिक्षक आणि ग्रंथालय जोपर्यंत विज्ञानवादी, तर्कवादी आणि विवेकवादी होत नाही तोपर्यंत समाज विवेकवादी होण्याची शक्यता नाही. मानवेंद्रनाथ रॉय यांनी म्हटले होते, वैज्ञानिक क्रांतीचा जवळचा रस्ता शोधायचा असेल, तर शिक्षकाचे प्रबोधन करा. कारण शिक्षक पिढ्या घडवतात. त्यामुळे शिक्षक अंधश्रद्धाळू असेल, तर विद्यार्थी अंधश्रद्धाळू होतात. हेच विद्यार्थी पुढे पालक होऊन आपल्या मुलांना अंधश्रद्धाळू बनवतात. म्हणून शिक्षण आणि साक्षरता यातला फरक नीटपणे समजावून घेण्याची गरज आहे. महात्मा फुले म्हणतात, 'विद्येविना मती गेली आणि मतीविना नीती गेली.' याचा अर्थ, सारासार विवेकबुद्धी निर्माण करणे आणि नैतिक मनुष्य घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे. सध्या हे घडताना दिसत नाही. कारण अभ्यासक्रम शिकवून परीक्षा घेणे हेच माझे कार्य आहे, असे शिक्षक समजतात आणि अभ्यासक्रम घोकून परीक्षा देणे हे आपले कर्तव्य आहे असे विद्यार्थी समजतात. या दोन प्रचंड अंधश्रद्धा नष्ट झाल्याशिवाय समाज विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी बनू शकत नाही.

'देवा किती सुंदर आकाश, सुंदर प्रकाश सूर्य देतो', ही पहिलीतली कविता सरळ सरळ सांगते, आकाशासकट हे सारे जग कोणातरी ईश्वर नावाच्या प्राण्याचे आहे. पुराणातील भाकड कथांची माहिती देणे म्हणजे मूल्यशिक्षण आहे, यावर शाळांचा व सरकारचा ठाम विश्वास आहे. त्यातही पुन्हा एकाच धर्माच्या प्रार्थना संस्कृतसारख्या मृतभाषेमध्ये पाठ करायला लावणे म्हणजे मूल्यनिर्मिती करणे असे समजले जाते. याबाबत मला इंग्लंडमधील एक उदाहरण आठवते. जैव तंत्रज्ञानातील नोबेल पारितोषिक विजेते सर हरमन बॉन्डी यांनी विसाव्या शतकांच्या आठव्या दशकात दोनशे प्रमुख शास्त्रज्ञांना घेऊन एक चळवळ उभारली. मुलगा किंवा मुलगी प्रौढ होईपर्यंत (१८ वर्ष) त्यांना कोणत्याही शाळेने कोणतेही धार्मिक शिक्षण देऊ नये. शाळेतील प्रार्थना आणि अभ्यासक्रम यातून बायबल काढून टाकण्यात यावे अशी मागणी केली. या विरोधात चर्च, शिक्षक, पालक सारेच उभे राहिले आणि आमच्या मुलांना काय शिकवायचे हे आम्ही ठरवू, अशी पालकांनी भूमिका घेतली. आणि सर हरमन बॉन्डी व त्याचे सहकारी हे धर्म व बायबलविरोधी आहेत, असे घोषित करण्यात आले. यावर सर हरमन बॉन्डी यांनी सांगितले की, मी कोणत्याही धर्माविरुद्ध नाही. परंतु नागरिक सज्ञान होईपर्यंत त्यांच्यावर धार्मिक संस्कार करणे योग्य नाही, कारण बायबलमधील गोष्टी विज्ञानविरोधी आहेत. बायबल सांगते, पृथ्वी सपाट आहे आणि सूर्य पृथ्वीभोवती फिरत आहे. याउलट विज्ञानाचे शिक्षक शिकवतात पृथ्वी गोल आहे आणि ती सूर्याभोवती फिरते. या परस्परविरोधी शिकवण्यामुळे मुलांची विचारशक्ती खुंटते. ब्रिटिश सरकारने सुरुवातीला बॉन्डी यांच्या मागणीला नकार दिला तेव्हा बॉन्डी व इंग्लंडमधील दोनशे सर्वोच्च शास्त्रज्ञ यांनी आपआपल्या पदाचे राजीनामे दिले. त्यामुळे सरकारला माघार घ्यावी लागली आणि शाळेतील बायबल बंद झाले.

भारतामध्ये विज्ञानाचे शिक्षकदेखील देवाच्या नावाने उपवास करतात, नवस बोलतात, वास्तुशांती व सत्यनारायण घालतात. हे शिक्षक विद्यार्थ्यांना बुद्धिवादी व तर्कवादी बनवू शकतील काय? शाबुदाण्यामध्ये, ज्वारीमध्ये, बटाट्यामध्ये, गव्हामध्ये एकच कार्बोहायड्रेट आहेत हे माहीत असूनही रसायनशास्त्राच्या शिक्षकाला उपवासादिवशी शाबुदाणा चालतो; पण भाकरी चालत नाही. शिक्षणाद्वारे अंधश्रद्धा निर्मूलन शक्य आहे काय? आणि त्यासाठी कोणता अभ्यासक्रम वापरावा लागेल? विज्ञान, इतिहास, गणित, भूगोल किंवा समाजशास्त्र हे सारे विषय नीटपणे शिकवले तर आपल्याला बुद्धिवाद, समता, धर्मनिरपेक्षता ही सारे मूल्ये रूजविता येतात. पण ही कशी रुजवायची याचे प्रशिक्षण दुर्दैवाने शिक्षकांना दिले जात नाही. समाजातील शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि बुद्धिवादी विचारवंत याचे हे कर्तव्य आहे. धर्म ही वारसाहक्काने मिळणारी गोष्ट नसून ती

विचारपूर्वक अभ्यास करून स्वीकारण्याची गोष्ट आहे. महात्मा फुले म्हणतात, एकाच कुटुंबात वडील हिंदू, आई मुस्लीम, एक मुलगा ख्रिश्चन आणि दुसरा सत्य धर्माचा असू शकतो. पण ही गोष्ट वैचारिक चर्चेने शक्य आहे. माणूस कोणत्याही जातीधर्माचा असला तरी जातीनुसार त्याचे रक्तगट ठरत नाहीत. नैसर्गिक आपत्ती येतात, अपघात होतात, त्यामध्ये लोक मृत्युमुखी पडतात ते साऱ्या धर्माचे व जातीचे असू शकतात. एखादा उच्च जातीचा आहे म्हणून कोण त्याच्या घराला शिवणार नाही, असे कधी होत नाही. रक्ताच्या पेशी कमी होताना त्या कातडीचा रंग विचारत नाहीत आणि कॅलशियम कमी झालं की ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र, मुसलमान किंवा ख्रिश्चन साऱ्यांची हाडे ठिसूळ होतात हे शिकवणे विज्ञान शिक्षकाला अशक्य आहे का? संविधानातील प्रास्ताविकामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनही प्रमुख गोष्ट सांगण्यात आली आहे. दोन अधिक दोन चार असते. गणिताची चिन्हे आणि क्रिया धर्मानुसार बदलत नाहीत किंवा देशानुसार बदलत नाहीत. तीर्थयात्रेला जाणाऱ्या पुण्यवान माणसाच्या गाड्यांना अपघात का होतात? कोरोनाच्या साथीमध्ये सर्व धर्मातील पुरोहित मेले त्यांना देवांनी का वाचवलं नाही? शाळेतील मुलांना विचार कसा करावायाचे प्रशिक्षण देणे शक्य आहे. उदाहरणार्थ, परीक्षा जवळ आल्यावर देवळातील मुलांची गर्दी वाढते अशा वेळेस काही प्रश्न मुलांना विचारता येतील. वर्गात पहिला येणारा मुलगा देवा, मला पास कर. मी किलोभर पेढे वाटीन असे म्हणेल काय? ज्याने अभ्यास केला नाही त्याला किलोभर पेढ्याच्या आशेने परमेश्वर पास करेल काय? परमेश्वराला परीक्षा नावाची माहिती असते काय? परमेश्वर लाचखाऊ असतो का? आणि त्याला गोष्टी खाता येत नसताना पेढ्याचा लोभ दाखवता येईल काय? पास-नापास परमेश्वराच्या हाती असेल, तर शिक्षक आणि परीक्षक यांना पगार का दिला जातो? ही प्रश्नांची मालिका शिक्षकांनी वर्गात मुलांच्यासमोर उभी केली तर बदल घडणार नाही काय? परमेश्वर नावाच्या गोष्टीची चमचेगिरी करणाऱ्या प्रार्थनांच्याऐवजी बौद्ध, जैन, लिंगायत उपनिषधे यातील मानवतावादी प्रार्थनांचा समावेश करणे शक्य आहे. शिक्षकाचे विशेष वर्ग घेऊन विवेकवाद आणि विज्ञानवाद याचा वापर करून अभ्यासक्रम कसा शिकवावा हे शिकवावे लागेल. एक गोष्ट निश्चित आहे की, माणसाच्या मेंदूतील अंधश्रद्धेची रोपे उपटून काढण्याचे शिक्षण शाळांमधून मिळाल्याशिवाय अंधश्रद्धा निर्मूलन शक्य नाही. केवळ प्रयोग आणि व्याख्याने याची मोहीम उघडणे म्हणजे खोलीतील नळ सुरू ठेवून छोट्या फडक्याने फरशी कोरडी करण्याचा निष्फळ प्रयत्न आहे.

**(लेखक ज्येष्ठ विचारवंत, सामाजिक चळवळींचे अभ्यासक, वक्ते व परिवर्तनवादी कार्यकर्ते आहेत.)**

●

## मासिक पाळीचा महोत्सव !!



अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते कृष्णा व ॲड. विद्या चांदगुडे यांची तेरा वर्षांची मुलगी यशदा हिला कार्यक्रमाच्या दोन दिवस अगोदर प्रथमच मासिक पाळी आली. त्यानिमित्ताने नाशिक येथे तिच्या प्रथम मासिक पाळीच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. 'आता माझी पाळी, मीच देते टाळी' हे घोषवाक्य घेऊन उपक्रम राबवला गेला. मासिक पाळी या विषयावर समाजबंध संस्थेचे कल्पेश जाधव यांनी व्याखानातून जनजागरण केले. या विषयाकडे समाजाचा पाहाण्याचा दृष्टीकोन सकारात्मक व्हावा, यासाठी या महोत्सवात 'कोष' हा लघुपट दाखवला गेला.

## भावपूर्ण आदरांजली



**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ज्येष्ठ कार्यकर्ते विनायक (काका) चव्हाण (इचलकरंजी) त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!**



# कार्याध्यक्ष संवाद

माधव बावगे
९४०४८७०४३५

प्रिय साथी,

स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे केले जात आहे. यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ३३ वर्षांच्या योगदानाची नोंद करणे गरजेचे वाटते. दाभोलकरांच्या दूरदृष्टी आणि कल्पक नेतृत्वाखाली ९ ऑगस्ट १९८९ साली एक पंचसूत्री ठरवून हे काम सुरू झाले. ही वाटचाल अंधश्रद्धा निर्मूलन, शास्त्रीय विचार पद्धती, वैज्ञानिक दृष्टिकोन, विधायक धर्मचिकित्सा, धर्मनिरपेक्षता, विवेकवाद ते मानवतावाद या चढत्या क्रमाने डॉक्टरांच्या नंतरही अविनाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्याचा प्रयत्न समितीने केला आहे.

सर्व जाती-धर्मातील हजारो भोंदूबुवा, बाबा, मांत्रिक, देवी, माता, महाराज, बापू यांचा सतत भांडाफोड करून त्यांचे खरे रूप लोकांसमोर संघटनेने मांडले. लाखो लोकांची होणारी लूट थांबवली. भानामतीची हजारो प्रकरणे कुशलतेने हाताळून उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांना महा.अंनिसने जगण्याचा आधार दिला. ज्योतिषाला, बुवाबाजीला, चमत्काराला, भ्रामक वास्तूशास्त्राला, भूत संकल्पनेला, भानामतीला, पोतराज, नरबळी प्रथेला आव्हान देवून त्यातला फोलपणा जनतेसमोर मांडला. व्यसन, कालबाह्य कर्मकांड, हुंडा पद्धतीला फाटा देवून, जोडीदाराची विवेकी निवड उपक्रम तरुणाईत रुजवून आंतरजातीय सत्यशोधकी विवाहाला प्रोत्साहन देत जातविरहित समाजनिर्मितीसाठी चळवळ कृतिशील आहे. स्वातंत्र्याच्या अमृतवर्षातही या राज्यात आणि देशात समांतर न्यायव्यवस्था जातपंचायतीच्या नावाखाली चालू होती. हा अतिशय गंभीर प्रश्न सरकारपुढे मांडून, त्याचा पाठपुरावा करून सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा मंजूर करण्यास सरकारला भाग पाडले. संविधान बांधिलकी महोत्सव, पर्यावरणीय रक्षण, विधायक धर्मचिकित्सा, वैज्ञानिक दृष्टिकोन समाज मनात रुजवून समाज विवेकी बनवण्याचा अविरत प्रयत्न आजही सुरू आहे.

कोरोनाचा काळ ओसरल्यानंतर आपण सक्षम शाखा सक्षम संघटना हा उपक्रम राबवला. संघटनेत पुन्हा जुने-नवे कार्यकर्ते जोडले गेले. कार्यकर्त्यांना संघटनात्मक प्रशिक्षणाची गरज होती. त्याचा विचार करून राज्य पातळीवर दोन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. कोकण, द. प. महाराष्ट्र आणि खानदेशातील नाशिक येथे दि.२३ व २४ जुलै २०२२ रोजी तर विदर्भ आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांचे दि.३० व ३१ जुलै २०२२ रोजी अमरावती येथे अतिशय उत्साहात पार पडले. नाशिक येथे ४७ जिल्हा कार्याध्यक्ष आणि प्रधानसचिव उपस्थित होते. अमरावती येथे ७६ जिल्हा व शाखा कार्याध्यक्ष, प्रधानसचिव उपस्थित होते. या दोन्ही प्रशिक्षण शिबिरात मुक्काम पोस्ट माझा जिल्हा, शाखा भेटी व त्याचा डेमो, नव्या शाखा निर्माण करणे, शाखा कार्यकारिणी निवड प्रक्रिया, संघटनेची पंचसूत्री, संघटनेपुढील आव्हाने, मी नेता माझ्या जिल्ह्याचा, पुढील चार महिन्यांचे नियोजन, SWOT मूल्यांकन हे विषय प्राधान्याने घेण्यात आले.

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिके'चा 'शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावरील विशेषांक प्रसिद्ध होत आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन व अंधश्रद्धा निर्मूलन केंद्रस्थानी ठेवून शिक्षण व्यवस्थेचे चिकित्सा करणारा हा अंक आपणास एक नवी दृष्टी देईल असे वाटते.

दि. २४, २५ सप्टेंबर २०२२ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीसाठी राज्य पदाधिकारी, जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधानसचिव विदर्भातील शाखांचे कार्याध्यक्ष आणि प्रधानसचिव यांनी उपस्थित राहाणे अत्यंत आवश्यक आहे. भेटूया नागपुरात. विवेकाचा आवाज बुलंद करूया.

•



# महाराष्ट्र अंनिसची खबरबात

अनिल शोभना वसंत
९८२३२८०३२७

## वयात येताना–लैंगिकता प्रबोधन

दि. १५ ते ३१ जुलै दरम्यान राज्यभर लैंगिकता प्रबोधनपर २८ कार्यक्रम घेण्यात आले.

**पालघर :** तारापूर विद्यामंदिर शाळा व



लोकनायक जयप्रकाश नारायण विद्यालय आणि अ.ज. वर्तक कनिष्ठ महाविद्यालय, आगरवाडी येथे दि.३० जुलै २०२२ रोजी वयात येताना या चित्रफितीचे प्रदर्शन आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. जवळजवळ १५०० मुलामुलींचे यानिमित्ताने प्रबोधन करण्यात आले. मा. आप्पा लोखंडे, परेश भोणे, हर्षल मोहिते, अनिल शोभना वसंत, राकेश दिवेकर इ. सहभाग घेतला.

**पाचोरा :** नवजीवन विद्यालय, पाचोरा येथे 'मुली वयात येताना' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रविंद्र चौधरी यांनी शारीरिक आणि मानसिक बदल, भिन्नलिंगी आकर्षण याबद्दल मार्गदर्शन केले. प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. माधुरी चौधरी यांनी मासिक पाळीविषयी सखोल मार्गदर्शन करत पाळीविषयी असलेले गैरसमज दूर केले.

**म्हसळा :** प्रभाकर पाटील एज्यु. सोसायटीची माध्यमिक शाळा, पाष्टी, ता. म्हसळा येथे १ ऑगस्ट रोजी 'वयात येताना' या चित्रफितीचे प्रदर्शन, गाणी आणि चर्चासत्र झाले. जवळपास ७५ मुलामुलींनी सहभाग घेतला. विजयकुमार सोनवणे, ऋतिका काकडे, सिद्धांत शिंदे, शाखा कार्याध्यक्ष जयसिंग बेटकर, प्रधानसचिव प्रमोद भांजी यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

**गडचिरोली:** दि. ०१ ऑगस्ट रोजी संजीवनी विद्यालय, नवेगांव येथे मुलांकरिता 'मुलगा वयात येताना' तर मुलींसाठी 'मुलगी वयात येताना' अशा स्वतंत्र चित्रफिती दाखवून मार्गदर्शन करण्यात आले.

**शहादा :** शाखेतर्फे लैंगिकता प्रबोधन अभियान राबविण्यात आले.

**कोल्हापूर :** करवीर शाखेतर्फे दिलीप कांबळे यांनी तीन हायस्कूलमध्ये तर पनवेल शाखेने बांठीया हायस्कूलमध्ये 'वयात येताना' ही चित्रफित दाखवत प्रबोधनपर कार्यक्रम सदर केला.



**मुरगूड :** विजयमाला मंडलिक हायस्कूल, मुरगूड व इनटेक एज्युकेशन पॉईंट, बिद्री येथे 'वयात येताना' या व्हिडीओद्वारे प्रबोधन करण्यात आले. भीमराव कांबळे, सचिन सुतार, स्मिता कांबळे, विकास सावंत, कृष्णा कांबळे, प्रविण सुर्यवंशी यांनी या उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला.

**नंदुरबार :** डॉक्टरांच्या मदतीने किर्तीवर्धन तायडे, वसंत वळवी, बलदेव वसईकर या कार्यकर्त्यांनी मुलामुलींच्या शाळेत जाऊन कार्यक्रम घेतला.

**बदलापूर :** दि. २९ जुलै रोजी अचिव्हर्स अकॅडमी येथे 'मुलगी वयात येताना' ही चित्रफित दाखवण्यात आली. शाखा अध्यक्ष डॉ. राजेश अंकुश आणि कार्याध्यक्ष अनिल चाळके यांनी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले.

**लातूर :** लातूर शाखेच्यावतीने कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे दि. ६ ऑगस्ट रोजी 'मुलगी वयात येताना' ही चित्रफित दाखवण्यात आली.

**आकुर्डी :** प्रेरणा माध्यमिक विद्यालय निगडी प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड येथे आकुर्डी (पुणे) शाखेने लैंगिकता प्रबोधन अभियानातंर्गत 'मुले-मुली वयात येताना' ही चित्रफित दाखवून अंनिसचे राज्य कार्यवाह दिगंबर कट्यारे, जिल्हा पदाधिकारी एकनाथ पाठक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

**कारंजा :** मॉडेल हायस्कूल, कारंजा घाडगे येथे समुपदेशक उज्वला वैद्य यांनी पाळीचे ऋतुचक्र समजावून सांगितले, तर जयश्री दिघाडे यांनी मासिक पाळीतील स्वच्छतेचे धडे दिले. या कार्यक्रमास जवळपास ३०० विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह

**जालना :** महा.अंनिस जालना जिल्ह्याच्या वतीने 'साप: समज गैरसमज' या विषयावर पोस्टर प्रदर्शन केले.

**गडचिरोली शाखा :** महात्मा गांधी विद्यालय, मूरखडा येथे सापाविषयी जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विलास निंबोरकर यांनी मार्गदर्शन केले. प्रधानसचिव प्रा. विलास पारखी यांनी सापांविषयी विस्तृत माहिती दिली. जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे यांनी चमत्कार सादरीकरण, तर नवेगाव शाखेच्या उपाध्यक्ष सौ. सुधा चौधरी यांनी मुलींच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन केले.

**बीड :** महिला कला महाविद्यालय, बीड आणि बीड शाखेच्या वतीने यशवंत विद्यालय, बीड येथे सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताहानिमित्त व्याख्यान आणि पोस्टर



प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. जवळपास ५०० विद्यार्थी आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**डोंबिवली :** यशवंत चांदजी सावंत विद्यामंदिर, भांडुप येथे दि. ३१ जुलै रोजी 'साप : समज आणि गैरसमज' या विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित केले होते. ठाणे जिल्हा विविध उपक्रम विभाग कार्यवाह परेश काठे यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करीत विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना सविस्तर उत्तरेही दिली.

**निमगुळ :** निमगुळ गावात पोस्टरद्वारे विषारी, बिनविषारी सापांची ओळख, समज-गैरसमज, अंधश्रद्धा तसेच साप चावल्यास घ्यावयाची काळजी याविषयी शेतकरी बांधवांना माहिती देण्यात आली.

**मुंबई :** नागपंचमीनिमित्त १ ऑगस्ट रोजी प्रभादेवी महानगरपालिका शाळा, २ ऑगस्ट रोजी श्रीराम महाविद्यालय, नाहुर(प), सरस्वती विद्यालय, घाटकोटपर आणि पंत वालावलकर महाविद्यालय, कुर्ला(पू) येथे सापाविषयी अज्ञान व अंधश्रद्धा यावर सविस्तर चर्चा आणि प्रश्नोत्तराच्या मध्यमातून संवाद साधला.

## महाअंनिसचा ३३ वा वर्धापनादिन

**लातूर :** लातूर येथे जिल्हा उपाध्यक्षा सुनितताई अरळीकर व विद्या हतोलकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

**पुणे :** चिंचवड येथील हॅन्डीकॅप सेंटर येथे पुणे जिल्हा कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याला ४३ कार्यकर्ते उपस्थित होते. पुणे जिल्हा अध्यक्ष मानव कांबळे, राज्य पदाधिकारी विशाल विमल, मनीषा महाजन, सामाजिक कार्यकर्ते सुनील चोरडिया यांनी मनोगत व्यक्त केले. राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे यांनी मार्गदर्शन केले. चाकण शाखेच्या कार्यकर्त्यांनी गाणी सादर केली.

**वर्धा :** मला अंनिसने काय दिले? मी अंनिसला काय देणार? यावर वर्धा शाखेने अनुभव कथनाचा कार्यक्रम आयोजित केला.

**बीड :** मअंनिस बीड जिल्ह्याच्या वतीने घाटनांदुर येथे संघटनेचा वर्धापन दिन राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य सरचिटणीस विनायक सावळे, रुक्साना मुल्ला, सांस्कृतिक विभागाचे राज्य कार्यवाह मनोहर जायभाये, प्रशिक्षण विभागाचे राज्य सहकार्यवाह सुधाकर तट यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला.

**शहादा :** शाखेच्या वतीने संघटनेचा वर्धापनदिन माजी जिल्हाध्यक्ष डॉ. शशांक कुलकर्णी, शहादा शाखेचे कार्याध्यक्ष संतोष महाजन यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**ठाणे :** वर्धापन दिनानिमित्त कल्याण शाखेने कुटुंब मेळावा आयोजित केला होता. 'अंनिसने मला काय दिले व अंनिसची वाटचाल' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. बदलापूर शाखेने ऑनलाईन, तर भिवंडी शाखेने ऑफलाईन पद्धतीने वरील विषयावरच चर्चासत्र घेत अंनिसचा वर्धापन साजरा केला.

**पाचोरा :** नव्या-जुन्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत चर्चा आणि चळवळीची गीते सादर करत वर्धापनदिन साजरा केला.

**नागपूर :** नागपूर (प) आणि जिल्हा शाखेच्या वतीने दि.९ ऑगस्ट रोजी हिंगणा येथील मैत्री व्यसनमुक्ती केंद्रात वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

**ऊर्जानगर :** ऊर्जानगर (चंद्रपूर) शाखेतर्फे वर्धापन दिनानिमित्त वृक्षरोपण करण्यात आले.

**यवतमाळ :** दि. १० ऑगस्ट रोजी यवतमाळ येथे स्कॉऊड गाईडद्वारा आयोजित कार्यक्रमात रुपेश वानखडे (राज्य युवा सहकार्यवाह) यांनी जादुटोणाविरोधी कायद्याबाबत सप्रयोग प्रबोधन केले. तसेच नागोराव काकपुरे यांनी अंनिसच्या वाटचालीची ३३ वर्षे या अनुषंगाने मांडणी केली.

**जालना :** जालना जिल्ह्याच्यावतीने बाजीउम्रद येथे गावातील १६ तरुण कार्यकर्त्यांच्या सहकार्याने नवीन शाखा

स्थापन करून चमत्कार सादरीकरण व सर्प विज्ञान प्रबोधन करत वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

**अकोला :** शाखेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान येथे राज्य उपाध्यक्ष महादेवराव भुईभार, राज्य सरचिटणीस प्रा.बबनराव कानकिरड, जिल्हाध्यक्ष अर्जुनराव गुडदे, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.संजय तिडके इत्यादींच्या उपस्थितीत वर्धापनदिन साजरा करण्यात झाला.

**गडचिरोली :** शाखेच्यावतीने महाअंनिस समितीचा वर्धापनदिन उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी 'मला महाअंनिसने काय दिले.' किंवा 'मी महाअंनिसमध्ये आल्यानंतर माझ्यात व्यक्तिगत बदल कसा झाला? त्याचा माझ्या कुटुंबाला कसा फायदा झाला' याची मांडणी केली.

**उदगीर :** शाखेतर्फे सर्पविज्ञानाचे ३३ कार्यक्रम विविध ठिकाणी राबवण्यात आले. त्याचबरोबर वेगवेगळ्या ३३ ठिकाणी ३३ प्रकारची झाडे लावण्यात आली.

**भंडारा :** भंडारा शाखेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले व कार्य-कर्त्यांना चमत्कार प्रयोग सादरीकरणाचे प्रशिक्षण देण्यात आले. 'संघटनेने काय दिले' या विषयावर ३० कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.

**कुर्ला :** कुर्ला शाखेच्या संवादमालेची सुरुवात 'अंनिसने मला काय दिले?' या विषयाने झाली. संवादमालेस १५ जणांची उपस्थिती होती. राज्य सरचिटणीस विनायक सावळे हे सुद्धा जॉईन झाले

**नवी मुंबई :** दि.९ ऑगस्ट रोजी वाशी येथे तृप्ती पाटील यांचे जादूटोणाविरोधी कायदा व प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे यांचे अतिंद्रिय शक्तीचे प्रयोग सादर करण्यात आले. सुशिला मुंडे यांनी संघटनेच्या वाटचालीचा धांडोळा घेत पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

**खेड :** एफ.ई.एस इंग्लिश स्कूल खेड फुरुस येथे खेड शाखेच्यावतीने 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर सचिन गोवळकर (जिल्हा कार्याध्यक्ष) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर सचिन शिर्के (खेड शाखा कार्याध्यक्ष) यांनी चमत्कार सादरीकरण करत वैज्ञानिक सत्य समजून सांगितले.

**यवतमाळ :** दि.९ ऑगस्ट रोजी रुपेश वानखेडे (राज्य युवा सह कार्यवाह) यांनी अंनिसच्या वाटचालीचा आढावा घेतला. 'मी अंनिसमध्ये कसा सहभागी झालो?' आणि 'मला अंनिसने काय दिले?' या विषयावरील चर्चेत प्रा. विजय गाडगे, किशोर पारटकर (जिल्हा प्रधानसचिव), विनय मिरासे (तालुका शाखा कार्याध्यक्ष), प्रल्हाद सिडाम आदींनी सहभाग घेतला.

**लासूर :** दि.९ ऑगस्ट रोजी लासूर स्टेशन येथे वर्धापन दिनानिमित्त मोटारसायकल रॅली काढण्यात आली व कार्यकर्त्यांनी दाभोलकरांच्या कार्यावर व संघटनेच्या वाटचालीवर मनोगत व्यक्त केले.

## स्वच्छता मोहीम






मअंनिस, मुंबई व जय फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ जुलै रोजी दादर चौपाटी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जय फाऊंडेशनचे संस्थापक जय श्रृंगारपुरे, राज्य प्रधानसचिव नंदकिशोर तळाशीकर, जिल्हा कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, राज्य सरचिटणीस विजय परब व सचिन थिटे, खालसा कॉलेज आणि किर्ती कॉलेजच्या एन. एस. एस. विभागासह ६० ते ६५ जणांचा या मोहिमेत सहभाग होता.

## विविध उपक्रमाच्या वाटेवर...

### चमत्कार सत्यशोधन दिन (२१ सप्टेंबर २०२२)

२१ सप्टेंबर १९९५ मध्ये गणपती दूध प्यायला अशी भली मोठी अफवा पसरवली होती, तिचे उच्चाटन व प्रबोधन करून अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सत्यशोधन करून ही निव्वळ अफवा आहे हे सिद्ध केले होते, त्या दिवसापासून अंनिसने २१ सप्टेंबर हा दिवस चमत्कार सत्यशोधन दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले. या निमित्ताने चमत्काराची दुनिया, विज्ञानाची किमया हा कार्यक्रम शाखेतर्फे राबवू शकतो.

# अभिनंदन



**किशोर बेडकिहाळ**

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिकेचे सल्लागार संपादक आणि पुरोगामी चळवळीतील कृतिशील कार्यकर्ते मा. किशोर बेडकिहाळ (सातारा) यांना प्रवरानगरच्या पद्मश्री विठ्ठलराव विखे -पाटील ट्रस्टचा राज्यस्तरावरचा प्रतिष्ठेचा 'साहित्य जीवन गौरव' पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याबद्दल त्यांचे महा.अंनिसच्यावतीने मन:पूर्वक अभिनंदन.

मा. बेडकिहाळ सामाजिक व राजकीय प्रश्नांवर लेखन करणारे विचारवंत आणि लेखक म्हणून परिचित आहेत. समाज प्रबोधन पत्रिकेचे संपादक म्हणूनही त्यांनी काम केले आहे. 'आंबेडकर अकादमी'चे ते संस्थापक कार्याध्यक्ष आहेत. अकादमीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या विचारवेध साहित्य संमेलनाचे ते संकल्पक आहेत.

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : एक मागोवा', 'पं. नेहरू आणि सेक्युलॅरिझम', 'एकात्मता यज्ञ : अर्थ आणि अनर्थ' या ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. 'धर्म आणि राजकारण', 'भारतीय राजकीय व्यवस्था', 'बदलता महाराष्ट्र', 'शतकांतराच्या वळणावर', 'विचारवेध संमेलन अध्यक्षीय भाषण खंड १', 'चौकटीबाहेरचे चिंतन' या ग्रंथांचे संपादनही त्यांनी केले आहे.



**मा.संध्या नरे-पवार**

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिकेच्या सल्लागार संपादक, ज्येष्ठ लेखिका व पत्रकार मा.संध्या नरे-पवार (मुंबई) यांना जळगाव येथील भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाउंडेशनचा राज्यस्तरावरचा प्रतिष्ठेचा 'कवयित्री बहिणाई' पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल महा.अंनिसच्यावतीने त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

संध्या नरे-पवार या ज्येष्ठ पत्रकार आणि स्त्रीवादी लेखिका म्हणून परिचित आहेत. 'डाकीण एक अमानवी प्रथा : शोध आणि अन्वयार्थ' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाजात आजही अस्तित्वात असलेल्या डाकीण या अघोरी प्रथेचे नेमके विश्लेषण या पुस्तकात त्यांनी केले आहे. दलित, आदिवासी, बहुजन स्त्रियांसह समग्र स्त्री-जातीच्या प्रश्नांचे नेमके आकलन त्यांच्या 'तिची भाकरी कोणी चोरली' या पुस्तकातून होते. त्यांच्या कामाची दखल घेऊन यापूर्वी त्यांना महाराष्ट्र फौंडडेशन पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.

## सर्प विज्ञान कार्यशाळा





'सामान्य रुग्णालय' येथील 'नर्सिंग महाविद्यालय' आणि नवीन प्राथमिक शाळा, किल्ला, जि. नाशिक येथे विज्ञान कार्यशाळा सपन्न. सर्प विज्ञान सामाजिक सप्ताह अंतर्गत डॉ.संदीप खैरनार यांनी मार्गदर्शन केले.

**– उत्तम जोगदंड**

## विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. ४

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ■ | ४ | | | ५ | |
| ६ | | ■ | ७ | ८ | | ■ | ■ | | ■ |
| | ■ | ९ | | | | ■ | १० | ■ | ११ |
| १२ | | ■ | १३ | | ■ | १४ | | ■ | |
| ■ | ■ | ■ | | ■ | १५ | ■ | | ■ | |
| १६ | १७ | | | | | | | १८ | |
| १९ | | ■ | | ■ | | ■ | ■ | | ■ |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | २० | | |
| ■ | २१ | २२ | | | ■ | २३ | ■ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | ■ | २४ | | | | |

**उभे शब्द**

१) डॉ. दाभोलकर हत्येच्या शीघ्र तपासासाठी महा. अंनिसने २०१७ साली चालविलेले आंदोलन.
२) हिमालयात सापडणारा विशाल हिमामानव
३) ॲसिडचा एक प्रकार
४) सजिवाची चालत असलेली जन्मक्रिया
८) भार
११) निर्वात बल्बचा शोध लावणारा शास्त्रज्ञ
१५) डोळ्याने नीट न दिसणे
१६) एक खडा/रत्न
१७) माहिती असलेले
१८) पृथ्वीच्या स्वतःभोवती फिरण्यामुळे पृथ्वीवर हे होते
२२) एक हजार किलोग्रॅम
२३) या जज साहेबांचा मृत्यू वादग्रस्त झाला आहे.

**(उत्तर पुढील अंकात)**

**आडवे शब्द:**

१) युद्ध किंवा स्पर्धेत झालेली सरशी
४) जीवनाचा आरंभ आणि अंत
६) तेलाच्या दिव्याची ही पेटवल्यावर प्रकाश निर्माण होतो
७) भारतीयांनी मुस्लिमांना दिलेले एक विशेषण
९) एक वायू
१२) कबीर यांचा काव्यप्रकार
१३) आधुनिक विज्ञानाच्या मदतीने बनवलेला प्रतिमानव
१४) आंब्याचे बी
१६) डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मरणार्थ २० ऑगस्ट रोजी पाळला जाणारा दिन.
१९) संदेश घेऊन जाणारा
२०) या नावाचा खडा रत्नशास्त्री विकतात
२१) मराठ्यांचा इतिहास लिहिणारा विलायती इतिहासकार
२४) व्हिडीओ कॅमेरा वापरून हे केले जाते.

## विवेक–विज्ञान शब्दकोडे ३ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ | १प | दा | र्थ | २वि | ज्ञा | ३न | ■ | ४डी | ५जे |
| ६ख | ळ | ■ | ■ | क्र | ■ | ७क्ष | य | ■ | स |
| त | ■ | ८आ | ९दि | म | ■ | त्रे | ■ | १०जी | न |
| ■ | ११अं | ■ | १२व | सा | ■ | ■ | १३गा | व | ■ |
| १४श्री | नि | १५वा | स | रा | १६मा | नु | ज | न | ■ |
| १७लं | प | ट | ■ | १८भा | ता | ■ | ■ | स | ■ |
| का | ■ | ■ | ■ | १९ई | ह | ■ | २०त | त्त्व | ज्ञ |
| ■ | २१आ | वा | ज | ■ | री | ■ | क्ष | ■ | ■ |
| ■ | वा | ■ | ■ | २२ता | ■ | २३र | शि | २४या | ■ |
| २५आ | का | श | गं | गा | ■ | ■ | २६ला | ग | ण |

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे

# विवेक जागर प्रकाशन

आणि अन्य प्रकाशनाची अंधश्रद्धा निर्मूलन कामाशी संबंधित पुस्तके

## सवलतीच्या दरात घरपोच मिळतील

आम्ही वारस विवेकाचे

**संपर्क : विशाल विमल – ७२७६५५९३१८ , नवल ठाकरे – ८२६२९१८७७५**

**सवलत योजना**

- ४ पुस्तकांच्या खरेदीवर ४० टक्के सवलत
- ३ पुस्तकांच्या खरेदीवर ३० टक्के सवलत
- २ पुस्तकांच्या खरेदीवर २० टक्के सवलत
- १ पुस्तकाच्या खरेदीवर १५ टक्के सवलत

**पोस्टेज खर्च वेगळा द्यावा लागेल.**

| पुस्तक | किंमत |
|---|---|
| **चमत्काराचा भुलभुलैय्या**<br>मच्छिन्द्रनाथ मुंडे | किं. २३० रु. |
| **अवयवदान देहदान : भ्रम आणि निर्भ्रम**<br>प्रा. डॉ. सुशील मेश्राम | किं. १३० रु. |
| **मृत्यूनंतरची सुंदर भेट**<br>संपादन : प्रा. डॉ. सुशील मेश्राम | किं. १३० रु. |
| **जोडीदाराची विवेकी निवड**<br>संपादन : आरती नाईक | किं. १३० रु. |
| **जातपंचायतींना मूठमाती**<br>कृष्णा चांदगुडे | किं. २२५ रु. |
| **फलज्योतिष : भ्रमातून वास्तवाकडे**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. २०० रु. |
| **ओळखा नवरत्नांचा विळखा**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ८० रु. |
| **जादुई वास्तव**<br>रिचर्ड डॉकिन्स, अनुवाद : शंतनू अभ्यंकर | किं. २५० रु. |
| **पृथ्वी मोलाचा माणुस**<br>संपा.अरविंद पाखले, राजेंद्र कांकरिया | किं. ३०० रु. |
| **मला बरं का वाटतं**<br>मच्छिन्द्रनाथ मुंडे | किं. ११० रु. |
| **सफर विश्वाची**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. २०० रु. |
| **असा ही विचार करायला काय हरकत आहे**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. १२० रु. |
| **यात असे आहे तरी काय ?**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. १२० रु. |
| **अंतराळ समजून घेताना**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ११० रु. |
| **पत्रिका जुळवताना**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ५० रु. |
| **दोस्ती ग्रह ताऱ्यांशी**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ५० रु. |
| **अंधश्रद्धा उन्मूलन आचार (हिंदी)**<br>डॉ. नरेंद्र दाभोलकर | किं. १५० रु. |
| **अंधश्रद्धा उन्मूलन विचार (हिंदी)**<br>डॉ. नरेंद्र दाभोलकर | किं. १५० रु. |
| **अंधश्रद्धा उन्मूलन सिद्धांत (हिंदी)**<br>डॉ. नरेंद्र दाभोलकर | किं. १५० रु. |
| **प्रयोग चमत्काराचे**<br>मच्छिन्द्रनाथ मुंडे | किं. २५ रु. |

**कार्यालय :** अविनाश पाटील, अध्यक्ष, महा. अंनिस, भास्कर, ६८, कालीकादेवी नगर, संगमा चौक, धुळे–०१.

**सोशल मीडिया मधील हॅंडल्सना भेट द्या/सबस्क्राईब करा/जॉईन व्हा...**

- वेबसाईट : http://mans.org.in
- फेसबुक पेज : MaharashtraNiS
- इन्स्टाग्राम : @mahaanis_mans
- ट्विटर : MahaANIS_MANS
- YouTube चॅनल : MNS महा अंनिस
- टेलिग्राम : mahaNIS

# विवेक निर्धार मेळावा

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमित्त पुण्यात विवेक निर्धार मेळावा झाला. या मेळाव्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ साहित्यिक अच्युत गोडबोले यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाची मांडणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंनिसचे अध्यक्ष अविनाश पाटील होते. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे कार्याध्यक्ष माधव बावगे, वचन साहित्याचे अभ्यासक डॉ. शशिकांत पट्टन, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. सुभाष वारे यांनी मनोगत व्यक्त केले.

राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे यांनी प्रस्तावित केले. राज्य पदाधिकारी विशाल विमल यांनी सूत्रसंचालन केले. अनिल करवीर, अतुल सवाखंडे आणि टीमने गाणी सादर केली. रेश्मा खाडे, विनोद खरटमोल, शीतल वसावे, अरविंद शिंदे, पी. एम. जाधव, प्रदीप हिवाळे, राजेश देवरुखकर यांनी निर्धार व्यक्त केला. अशोक निकम, बालाजी राऊत, धर्मराज चौरे, सारिका देहनकर, सचिन गोळवलकर, गजानन गायकवाड, घनश्याम येणगे यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. रंजना गवांदे यांनी आभार मानले.



ज्येष्ठ साहित्यिक अच्युत गोडबोले वैज्ञानिक दृष्टिकोनाविषयी मांडणी करताना


ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव मार्गदर्शन करताना


अध्यक्षीय भाषण करताना भाई अविनाश पाटील



अंनिसची भूमिका मांडताना कार्याध्यक्ष माधव बावगे



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. सुभाष वारे मनोगत व्यक्त करताना



वचन साहित्याचे अभ्यासक डॉ. शशिकांत पट्टन

## संघटनात्मक प्रशिक्षण शिबिर



पश्चिम-दक्षिण महाराष्ट्र, खानदेश, कोकण येथील जिल्हा कार्याध्यक्ष व प्रधान सचिवांचे संघटनात्मक प्रशिक्षण शिबिर दि. २३ व २४ जुलै २०२२ रोजी नाशिक येथे संपन्न झाले. या शिबिरात १४ जिल्ह्यातील कार्याध्यक्ष व प्रधानसचिव उपस्थित होते.

विदर्भ/ मराठवाडा येथील जिल्हा कार्याध्यक्ष व प्रधान सचिवांचे संघटनात्मक प्रशिक्षण शिबिराचा समारोप माधव बावगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. विचारमंचावर महादेवराव भुईभार, डॉ. अविनाश सावजी, संजय बनसोडे, विनायक सावळे, प्रा. परेश शहा, संजय शेंडे, सुरेश बोरसे, सुधाकर तट, अमरावतीच्या कार्याध्यक्षा गायत्री आडे उपस्थित होत्या. या शिबिरात ७२ प्रतिनिधी हजर होते.







**अभिनंदन**

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामासाठी आरती नाईक यांना **'वी नीड यू सोसायटी'** संस्थेतर्फे शिक्षणव्रती पुरस्कार प्रदान

**Printed Book Post**

प्रेषक,
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
द्वारा : प्रा. डॉ. नितीन शिंदे
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९.
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com

प्रति, ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.